सहकार भारतीचे
मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

ISBN
978-81-940842-0-4

# सहकार सुगंध

• पुणे • वर्ष : २० • अंक ११ • फेब्रुवारी २०२५ • पृष्ठे ४४ • किंमत : रु. ३०/- • संपादक : भालचंद्र कुलकर्णी



## ग्रामीण सहकाराला बळकटी देणारा अर्थसंकल्प




## केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांचा सहकार दौरा



2025
International Year of Cooperatives

Cooperatives Build
a Better World

## आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्ताने राज्यभरात सहकार दिंडीने उत्साह... राज्य पतसंस्था फेडरेशनचा पुढाकार

# दि धरमपेठ महिला

मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर. (महाराष्ट्र, छत्तिसगढ व मध्यप्रदेश)

आपला परिवार, आपली संस्था!

30 वर्ष विश्वासाचे

## BANKING P.O

90 DAYS TRAINING

BANKING POINT PROGRAMME P.O.

A Bridge of Banking Career

Join The Dharampeth Mahila Society Probationary Officer Programme P.O.

Enroll Now & Grab The Opportunity

8055026129

100% Placement Guarantee*

24x7 मोबाईल बँकिंग

आता

NEFT RTGS IMPS UPI

आपल्या मोबाईल द्वारे कुठेही, कधीही

बँकिंग व्यवहार तुमच्या मोबाईल वर

डिजिटल बँकिंग सुविधा

Cash Less बँकिंग व्यवहार

## सीताराम भवन ऑडिटोरियम आणि गेस्ट हाऊस

वाढदिवस | मुंज

लग्न | साक्षगंध

सांस्कृतिक कार्यक्रम

कॉन्फरन्स

7888002023

सर्व आर्थिक समाधानांसाठी एकच संस्था

तुमच्या सेवेत सदैव तत्पर

- LOCKERS सुविधा
- SMS अर्लट
- DEPOSIT सुविधा
- LIC पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
- NEFT, RTGS सुविधा उपलब्ध
- MOBILE बँकिंग
- ₹ 2200 कोटींच्या वर व्यवसाय
- GIC पॉलिसी काढण्याची व नुतनीकरणाची सुविधा
- GOLD LOAN उपलब्ध
- CORE बँकिंग
- MSEDCL विज बिल भरणा केंद्र
- LOAN सेवा सुविधा

Authorised Rail Ticket Reservation Centre

फ्लाईट | क्रूज | हॉटेल | बस

ONLINE BOOKING FACILITY AVAILABLEAT ALL BRANCHES

7020218417

वसंतपंचमी हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक

सौ. निलिमा बावणे, अध्यक्ष

सौ. सारिका पेंडसे, उपाध्यक्ष

संस्थेच्या सर्व संचालक मंडळ, पदाधिकारी व कर्मचारी वृंद

मुख्य कार्यालय : प्लॉट नं 42-अ सीताराम भवन, हनुमान मंदीर समोर, रामनगर चौक, शिवाजीनगर, नागपूर-440010.

फोन : 0712-2220716, 2524337, 2520303



राजर्षी शाहू मल्टीस्टेट
र.नं. ८९९
ISO 9001:2015 मान्यता प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून बँको पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून FCBA पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून मल्टीस्टेट फेडरेशनच सहकार गौरव पुरस्कार प्राप्त संस्था
कार्यक्षेत्र : महाराष्ट्र,मध्यप्रदेश
राजर्षी शाहू
राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. लि बुलडाणा
रा.ल. उपाध्य भाऊसाहेब शेळके
कॅश काढणे व जमा करतांना विड्रॉल किंवा जमा स्लीप न भरता पेपरलेस सुविधा देणारी संस्था...!
तुमच्या धाडसाला आमची अर्थपूर्ण साथ
Shahu Pay
Payments App
Google Play
करा नविन सुरवात
विविध लोन स्कीम्स, ठेव योजना
राजर्षी शाहू
इंटरनेट बँकिंग
डोअर स्टेप बँकिंग
मोबाईल बँकिंग
शाहू पे
RTGS
NEFT
संदीप शेळके
अध्यक्ष राजर्षी शाहू परिवार
Missed Call
Balance check सुविधा
7877778870
राजर्षी शाहू मल्टीस्टेट
COMING SOON
WhatsApp Banking
राजर्षी शाहू मल्टीस्टेट
संस्थेची वैशिष्ट्ये
१. एकुण ६९ शाखेचा विस्तार
२. ८०० कोटींचा व्यवसाय
३. १००००० सभासद संख्या
४. 'शाहू पे' हे पेमेंट ॲप विकसित करणारी भारतातील पहिली पतसंस्था
५. महिला बचत गटाच्या माध्यमातून ३५ हजार महिलांना १२५ कोटी रु. चे कर्ज वाटप
MAHAVITARAN
MSEB
वीज बिल भरणा केंद्र
Shahu Pay
खातेदारांना पेपरलेस् सुविधा देणारी
राजर्षी शाहू एकमेव पतसंस्था
शाहू पे द्वारे कोणत्याही शाखेमध्ये जमा स्लीप किंवा विड्रॉल फॉर्म न भरता QR कोड स्कॅन करून व्यवहार करता येईल.
सौ. मालती संदीप शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. लि बुलडाणा
www.rajarshishahumultistate.com
+९१ - ९५२८४९०४९०

# प्रशिक ग्रामीण सहकारी
## पतसंस्था मर्या., कारंजा (लाड)

र.नं. ७६०, पुंजानी कॉम्प्लेक्स, मेन रोड, कारंजा लाड, जि. वाशिम. फोन – ०७२५६ – २२४९८३

## आपणा सर्वांची आस्था, प्रशिक ग्रामीण सहकारी पतसंस्था!

## आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी स्वप्नपूर्ती कर्ज योजना

- लखपती कर्ज योजना
- ठेव तारण कर्ज
- घर दुरूस्ती कर्ज
- दीर्घ मुदती कर्ज
- वाहन कर्ज
- सोने तारण कर्ज
- अल्प मुदती कर्ज
- कॅश क्रेडीट
- सभासदांसाठी मालतारण कर्ज योजना

### सन २०२३-२४ संस्थेची स्थिती

| | | |
|---|---|---|
| सभासद | : | २६४१ |
| भागभांडवल | : | १,४०,४८,०१७ |
| ठेवी | : | ५०,१६,६२,३४८ |
| निधी | : | ३,३१,०७,६२७ |
| कर्ज | : | ४०,६८,९८,६५७ |
| गुंतवणूक | : | २०,८७,७३,६२४ |
| नफा | : | २,३५,७१,९०१ |
| ऑडीट | : | 'अ' |
| एन.पी.ए. | : | 0% |

### ठेवींवरील व्याजदर

| | | | |
|---|---|---|---|
| ४५ ते ९० दिवस | ७.00% | १ वर्षापेक्षा जास्त २ वर्षापर्यंत | ९.00% |
| १८० ते ३६५ दिवस | ८.00% | ३ वर्षांच्या वर ६६ महिन्यांपर्यंत | १0.00% |
| २ वर्षापेक्षा जास्त ३ वर्षापर्यंत | ९.५0% | मासिक ठेवीवर (ठऊ) | ९.00% |
| ९१ ते १७९ दिवस | ७.५0% | बचत ठेवीवर व्याज | ४.00% |

### सहकार्यातून विकासाकडे

- संगणीकृत शाखा
- इलेक्ट्रीक भरणा स्वीकृती केंद्र
- ATM सुविधा, QR कोड सुविधा
- RTGS, NEFT, SMS सुविधा
- ८७ महिन्यात दामदुप्पट
- १२३ महिन्यात दामतिप्पट
- ज्येष्ठ नागरिकांसाठी १% जास्त व्याजदर
- संस्थेचे स्वत:चे मालतारण गोडावून

**लवकरच प्रशिक फार्मर कंपनी आपल्या सेवेत रुजू**

### संचालक गण


ॲड. रवि काशिनाथ रामटेके
अध्यक्ष


आकाश भा. कन्हे
उपाध्यक्ष


अनिल दौ. आहुजा
मा. सचिव


पांडूरंग मो. भगत
संचालक


कृष्णा वि. राऊत
संचालक


गुलाबराव चं. साटोटे
संचालक


अशिष मा. वंड
संचालक


भास्कर द. ढोले
संचालक


मेघन म. जुमळे
संचालक


सौ. सुनिता दि. उके
संचालिका


सौ. छाया ग. गांवडे
संचालिका


सौ. आशा कृ. राऊत
व्यवस्थापक


श्री. दिपक द. ढोले
वरिष्ठ लिपीक


लोकमान्य
शुभारंभ
2025
योजना
नवे पाऊल, नवा संकल्प, आरंभ उज्ज्वल भविष्याचा!
*फक्त सभासदांकरिता *नियम व अटी लागू
सर्वोत्तम व्याजदर
किमान गुंतवणूक 10,000/-
कालावधी 13 महिने
ज्येष्ठ नागरिकांसाठी 0.50% अधिक व्याजदर
10%
स्थापना 1995
लोकमान्य
मल्टिपर्पज को-ऑप. सोसायटी लि. (मल्टी-स्टेट)
प्रधान कार्यालय - पुणे, महाराष्ट्र
महाराष्ट्र • कर्नाटक • गोवा • दिल्ली
Reg. No. M.S.C.S./C.R./140/2002
संस्थापक - अध्यक्ष : डॉ. किरण ठाकुर, सल्लागार संपादक, तरुण भारत, बेळगाव.
Call 1800 212 4050 | lokmanyasociety.org


netwin
Ideas to Life
एकमेव उद्देश... ग्रामीण बँकिंगला
भारताच्या अर्थव्यवस्थेत समाविष्ट करणे.
₹ १६.६७ कोटी
प्रति महिना IMPS व्यवहार
₹ २५० कोटी
प्रति महिना उलाढाल
३ लाख
व्यापारी डिजिटल
व्यवहाराचे भागीदार
९,०७,१६८
सरासरी मासिक
UPI व्यवहार
NetPay-UPI
QR Code
Certification's
CMMI
TIER3 DATA CENTER
CISA
अधिक माहिती साठी संपर्क करा
०२५३ ६६५ १५००
sales@netwinindia.in
www.netwin.in

AURO®

SINCE 1948

ISO CERTIFIED ISO 9001 : 2008

BIS Certified

IS : 550 CM/L.No.7200069405 | IS : 550 CM/L.No.3740863 | IS : 550 CM/L.No.2863066 | IS : 550 BIS Certified



## SALES & SERVICES

# ALL MAHARASHTRA REGION

CASH SAFE I GOLD SAFE I VAULT I LOCKER CABINET
JEWELLER'S SAFE I PETROL PUMP SAFE

Our trusted partners for 75 years

**Contact : Mrs. Suvarna Kshirsagar**

Office Address : 1453, Shop No. 06, Shiv Parvati Society, Behind Janata Sahakari Bank. Khadilkar Path, Bajirao Road, Shukrawar Peth, Pune -411002

mtc1506pune@yahoo.com www.aurombica.com

7559283467 I 9685061515 I 9879791521

VISUAL
INFOSYSTEMS PRIVATE LIMITED
A core banking software solutions

3000+ SATISFIED CLIENTS

# व्हिज्युअल इन्फोसिस्टीम्स प्रा.लि.

A Core Banking Software Solutions

छत्रपती संभाजीनगर



संपूर्ण महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर अग्रेसर असलेले
सर्वाधिक पसंतीचे कोअर बँकिंग सॉफ्टवेअर

* ऑडीटसाठी लागणारे सर्व रिपोर्ट उपलब्ध
* डोअर स्टेप बँकिंग मोबाईल ॲप
* क्रेडिट स्कोअर रिपोर्ट * क्यू. आर. कोड कलेक्शन
* आधार/पॅन पडताळणी * इंटरनेट बँकींग
* ऑनलाईन मोबाईल बँकींग
* मॅनेजमेंट मोबाईल ॲप
* मोबाईल ॲप फॉर बँक स्टाफ
* कस्टमर ॲप
* रिकव्हरी ॲप

**CERTIFICATIONS:**
VAPT & CERT In Certification for Web and Android App Certified by TUV-SUD ISO 9001:2015 ISO/IEC 27001:2013

आजच आपल्या बँक, पतसंस्था, मल्टीस्टेट, कर्मचारी सोसायटी, एन बी एफ सी (NBFC) मध्ये कोअर बँकिंग सॉफ्टवेअर सुरु करा.

Contact Us

कॉर्पोरेट ऑफिस :
व्हिज्युअल इन्फोसिस्टीम्स प्रा.लि.
अ-२४-५, चिखलठाणा औद्योगिक क्षेत्र,
छत्रपती संभाजीनगर - ४३१००६

हेड ऑफिस :
व्हिज्युअल इन्फ्रोसिस्टीम्स प्रा.लि.
थर्ड फ्लोर, मालन प्लाझा.
दुर्गा माता मंदिरा जवळ, आकाशवाणी रोड,
छत्रपती संभाजीनगर - ४३१००५

+91 9423000202 +91 9209000096
+91 9763878000 +91 8080342437
+91 8080762775 +91 9763873000
+91 9545002127 +91 9730070680

Email : info@visualinfosystems.in website : www.visualinfosystems.com

|| बिना संस्कार नहीं सहकार । बिना सहकार नहीं उद्धार ||

# सहकार सुगंध

ISBN : 978-81-940842-0-4

# अनुक्रम

* नागरी सहकारी बँकांच्या सहाय्यासाठी स्वतंत्र महामंडळ....................................११
* देशभरात सहकार भारतीच्या विस्ताराबरोबरच प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करणार : सहकार भारती राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी........................................................१२
* अर्थसंकल्पातील सहकार क्षेत्राच्या तरतुदींबद्दल संमिश्र प्रतिक्रिया..........................१३
* सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशच्या माजी अध्यक्षा डॉ. शशिताई अहिरे यांचे निधन ...........१४
* सहकारातून, सामाजिक कार्याचा वसा जोपासणाऱ्या; डॉ. शशिताई अहिरे ..................१५
* देशाच्या सर्वांगीण विकासाच्या प्रक्रियेत सहकार क्षेत्राचा मोठा वाटा – डॉ. उदय जोशी.....१६
* सहकारी संस्थांच्या माध्यमातून महिला सबलीकरण – सतीश मराठे ........................१७
* कर्ज देणाऱ्या सहकारी संस्थांना तंत्रज्ञानाचा लाभ एक नवीन दृष्टिकोन .......................१८
* देशातील सहकारी संस्थासाठी सहकार विद्यापीठ स्थापन होणार............................१९
* अपना सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी दत्ताराम चाळके, उपाध्यक्षपदी विकास फाटक ........२०
* समस्यांचे निराकरण करून सहकार क्षेत्र बळकट करू – सहकार राज्यमंत्री डॉ. भोयर.......२१
* सहकार भारतीच्या विचाराने सहकाराची दिशा ठरवू – सहकार राज्यमंत्री डॉ. भोयर.. .......२२
* आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्ताने राज्यभरात सहकार दिंडीने उत्साह........................२३
* सहकारी संस्था चालवताना सुशासन गरजेचे – सुधीर पंडित ...............................२५
* राजर्षी शाहू मल्टिस्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटी पुरस्काराने सन्मानित.....................२६
* नवीन सहकारी बँकांच्या निर्मितीस प्रोत्साहन देण्याची केंद्राची भूमिका – डॉ. जोशी.........२७
* सहकार भारती सांगली जिल्हा (ग्रामीण) नूतन कार्यकारणी जाहीर ..........................२८
* बँकिंग – फिजिकल नव्हे आता डिजिटल!..................................................२९

## पुढील अंक जागतिक महिला दिन विशेषांक (मार्च २०२५)

सहकार क्षेत्रातील विविध संस्थांमध्ये महिला मोठ्या संख्येने यशस्वीरित्या कार्यरत आहेत. याखेरीज अनेक महिलांनी उल्लेखनीय कामगिरीदेखील नोंदवली आहे. विशेषत: बचत गटासारख्या माध्यमातून महिला सबलीकरणाची प्रक्रिया यशस्वी झाल्याचे दिसते आहे. या अनुषंगाने सहकार सुगंध मासिकाचा पुढील अंक जागतिक महिला दिन विशेषांक असणार आहे. यासाठी महिलांच्या कर्तृत्त्वाचा आलेख घेणाऱ्या मुलाखती, लेख २० फेब्रुवारीपर्यंत कार्यालयाकडे पाठविण्यात याव्यात. जेणेकरून हा विशेषांक अधिकाधिक वाचनीय होऊ शकेल. – संपादक

'सहकार सुगंध' हे मासिक मालक, सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक भालचंद्र कुलकर्णी यांनी एन. आर. एंटरप्रायजेस, स.नं. ३९, माणिकबाग इंडस्ट्रियल इस्टेट, सिंहगड रोड, पुणे – ४११ ०५१ येथे छापून ए-१२, निखिल पार्क सी सोसायटी, माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे – ४११ ०५१ येथे प्रसिद्ध केले.
**संपादक –** भालचंद्र कुलकर्णी

'Sahakar Sugandha' monthly is owned by 'Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., printed & published by Bhalchandra Kulkarni, Printed at N. R. Enterprises, S.No. 39, Manikbaug Industrial Estate, Sinhgad Road, Pune - 411051 & published at A-12, Nikhil Park, 'C' Society, Manikbaug, Sinhgad Road, Pune - 411051.
Editor : Bhalchandra Kulkarni

**फेब्रुवारी २०२५ (वर्ष २०, अंक ११)**

**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०९)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)

**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय महामंत्री)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
डॉ. उदय जोशी (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. दीपक चौरसिया (राष्ट्रीय महामंत्री)
श्री. दीनानाथ ठाकूर (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
श्री. दत्ताराम चाळके (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. शरद जाधव (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर, श्री. सतीशजी मराठे,
श्री. ज्योतिंद्रभाई मेहता, श्री. विष्णूजी बोबडे,
श्री. संजय परमणे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे

**दि. १ जानेवारी २०२५ पासून वर्गणीचे नवीन दर**
**वार्षिक वर्गणी :** रु. ७००/- फक्त
**त्रैवार्षिक वर्गणी :** रु. १८००/- फक्त
**खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.**

**कृपया चेक / डीडी 'सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.' या नावाने पाठवावा. (पुणे येथे देय असलेला)**

**सहकार सुगंध कार्यालय :**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, ५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे – ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

# आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने.....

संयुक्त राष्ट्र संघाने २०२५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून घोषित केले आहे. त्याला सकारात्मक प्रतिसाद म्हणून अर्थव्यवस्था आणि मानवी विकासासाठी सहकार क्षेत्राचे महत्त्वपूर्ण योगदान जाणून केंद्र सरकार आणि राज्य सरकारने देखील विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. या वर्षात असे विविध कार्यक्रम सहकारातील प्रत्येक स्तरावरून होण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेच्या निमित्ताने केवळ उत्साही कार्यक्रमाचे आयोजन न करता सहकाराच्या अनुषंगाने चिंतन, मंथन व प्रबोधन अशा संकल्पनांच्या माध्यमातून वैचारिक आदान-प्रदानाच्या हेतूने विविध उपक्रम राबवण्याची गरज आहे.

आंतरराष्ट्रीय सहकार परिषद आयोजनामागचे नेमके प्रयोजन पाहणे हेही संयुक्तिक ठरणारे आहे. कारण सहकार हा आज आपणा सर्वांचा युग धर्म ठरतो आहे. सर्वसामान्यांच्या वंचितांच्या दृष्टीने तर तो परवलीचा शब्द ठरला आहे. सहकार ही आपल्या देशाची संस्कृती आहे. सहकार हा आपल्या देशात रुजला, अंकुरला, वाढला, बहरला इतकेच नव्हे तर त्याच्या सान्निध्यातील लोकांचा तो आधारवड ठरला आहे. सहकाराने अवघे समाज जीवन व्यापून टाकले आहे.

देशात सुमारे साडे आठ लाख सहकारी संस्था कार्यरत असून सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांचे सभासद सुमारे ३० कोटींच्या आसपास आहेत. त्यामधील महाराष्ट्रात सुमारे २ लाख २५ हजार सहकारी संस्था असून त्यांची एकत्रित सभासद संख्या सुमारे ६ कोटी एवढी आहे. देशातील ३० कोटी तर महाराष्ट्रातील ६ कोटी जनता ही सहकार तत्त्वावरील साखर कारखाने, सूत गिरण्या, जलसिंचन योजना, सहकारी बँका, पतसंस्था, गृहनिर्माण सोसायटी, दूध संस्था यांच्याशी थेट निगडित असून ते अशा संस्थेचे लाभार्थी आहेत. अशा व्यापक सहकाराच्या माध्यमातून प्रत्येकाच्या घराघरांमध्ये समृद्धी आणण्याचा, त्यांच्या जीवनाला अर्थपूर्णता देण्याचा, त्यांच्या शिक्षण, नोकरी, आरोग्य संदर्भात सकारात्मक परिवर्तन घडविण्यात सहकाराची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. देशाच्या व राज्यातील जडणघडणीचा शिल्पकार, साक्षीदार, भागीदार ठरणाऱ्या सहकार क्षेत्राचा परिचय सर्व दूर सर्वव्यापी, सर्वंकष व्हावा हा देखील या प्रयोजनाचा प्राधान्यक्रम ठरावा असे वाटते.

सहकाराची उपलब्धी पाहता जनसामान्यांच्या अर्थसहाय्यातून त्यांचे जीवन समृद्ध करण्याचे, उद्योग व्यवसाय, पशुपालन, व्यापाराच्या माध्यमातून त्यांच्या विकासाचे आधारवड होण्याचे कार्य होताना दिसत आहे. सहकार क्षेत्र विकसित होत असताना परिजन, परिवार, परिसर विकास अधोरेखित करताना दिसत आहे. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था आर्थिक विषमतेची दरी दूर करण्यासाठी केलेल्या उपाययोजना, विविधांगी कार्य जनतेपुढे मांडून 'सहकारातून समृद्धी' हे वास्तव अधोरेखित करण्याचा एक प्रयत्न म्हणूनही या आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाकडे पहावे लागेल.

केंद्रातील सहकार मंत्रालयाने सहकार क्षेत्रासाठी भरीव कामगिरी केली असल्याचे दिसून येते. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वात सहकार मंत्रालयाने केवळ तीन वर्षांतच, ५६ महत्त्वाच्या योजना राबवल्या आहेत. यामुळे देशभरातील जवळपास आठ लाख सहकारी संस्थांना, बळकटी मिळाली आहे. 'आंतरराष्ट्रीय सहकारी परिषद ग्लोबल कॉन्फरन्स २०२४' चे आयोजन प्रथमच भारतात करण्यात आले. सहकाराच्या १३० वर्षांच्या इतिहासामधील ही ऐतिहासिक घटना ठरली. याचवेळी पंतप्रधान मोदी यांनी, संयुक्त राष्ट्रसंघाच्या २०२५ साली 'आंतरराष्ट्रीय सहकार वर्षा'चीही सुरुवात केली. सहकार मंत्रालयाने ग्रामीण भारताला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी, अनेक योजना राबवल्या आहेत. पंतप्रधान मोदींनी जागतिक स्तरावरील, सर्वात मोठी धान्य साठवण योजना सुरू केली आहे. ११ राज्यांतील २११ प्रायमरी ॲग्रिकल्चरल क्रेडिट सोसायटींमध्ये प्रायोगिक प्रकल्प सुरू झाले आहेत. ५०० नवीन गोदामे आणि १८ हजार क्रेडिट सोसायटींचे संगणकीकरण करण्यात आले आहे. आज क्रेडिट सोसायटी या केवळ पतसंस्था राहिलेल्या नसून त्या बहुउद्देशीय केंद्रांमध्ये ३ रूपांतरित झाल्या आहेत, जसे की डेअरी, मत्स्यपालन, जनऔषधी केंद्रे, पीएम किसान समृद्धी केंद्रे, पाणी व समित्या, ड्रोन सेवा इ.

नव्याने सहकार विद्यापीठ गुजरातमध्ये त्रिभुवन सहकार विद्यापीठ नावाने सुरू होणार असल्याची घोषणा व त्यासाठीचे विधेयक संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडण्यात आले आहे. ही देखील एक जमेची बाजू आहे. सहकार चळवळीसाठी विविध प्रकारचे उपक्रम आणि उपाय देखील करण्यात येत आहेत. सहकारातील सकारात्मक बदलांची नोंद आता सर्वांनीच घ्यायला हवी.

जय सहकार!!



संपादकीय...



# नागरी सहकारी बँकांच्या सहाय्यासाठी स्वतंत्र महामंडळ

## मुंबई, मालेगाव येथे अमित शहांकडून उद्घाटन

**मुंबई –** आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात सहकार क्षेत्राच्या विस्तारासाठी शिस्त आणि शुचिता आणि संस्थांना समृद्ध करणे यावर अधिक भर देण्यात येणार आहे. तसेच केंद्र सरकारच्या विविध योजना, उपक्रम याचा प्रसार आणि प्रचार मोठ्या प्रमाणावर करण्यात येणार असल्याचे केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांनी येथे संगितले. मुंबईतील कार्यक्रमाबरोबर मालेगाव याठिकाणी झालेल्या कार्यक्रमात त्यांनी सहकार क्षेत्र आगामी काळातील योजना तसेच उपक्रम याबाबत सविस्तर विवेचन केले.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष सन २०२५ च्या प्रारंभानिमित्त येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार तसेच केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, नॅफकबचे अध्यक्ष ज्योतिंद्रभाई मेहता व्यासपीठावर होते. यावेळी सहकार वर्षातील कार्यक्रमाची दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आली. यावेळी राष्ट्रीय शहरी सहकार वित्त आणि विकास महामंडळाच्या मुंबईतील कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. सर्वांना एकसमान तंत्रज्ञान मिळावे, तसेच बँकिंग क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान उपलब्ध व्हावे यासाठी हे महामंडळ काम करणार आहे.

**देशाला आर्थिक शक्ती बनविण्यासाठी सहकार क्षेत्राची महत्त्वाची भूमिका**

भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी आर्थिक शक्ती बनविण्यासाठी आणि सन २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनविण्याचे पंतप्रधान मोदी यांचे ध्येय आहे. यासाठी सहकार क्षेत्राची मोठी भूमिका असणार आहे असे नमूद करून ते म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून देशभरातील सहकार क्षेत्रातील लोक, सहकार मंत्रालय स्थापन करण्याची मागणी करायचे, त्यांचे कोणीही ऐकत नव्हते. पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतर सहकार मंत्रालयाची स्थापना केली आहे. यामुळे देशातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे. इथे आत्मनिर्भरतेची सर्वात सुंदर कुठली व्याख्या असेल तर ती सहकार आहे, असे ते म्हणाले.

**बँकांची एकछत्री संघटना बळकट करणार**

सरकारने आरबीआय सोबतचे नागरी सहकारी बँकांचे अनेक प्रश्न सोडविले आहेत असे नमूद करून ते म्हणाले, नजीकच्या काळात बँकांची एकछत्री संघटना बळकट करून विश्वास आणि व्यापार वाढविण्यावर भर दिला जाणार आहे. सर्व शेड्यूल्ड सहकारी बँका राष्ट्रीय बँका आणि खासगी बँकांना असणाऱ्या सेवा सुविधा पुढील ३ वर्षात सर्व शेड्यूल्ड सहकारी बँकांना देण्यात येणार आहेत. देशात एकूण १४६५ नागरी सहकारी बँका असून त्यातील निम्म्या बँका या महाराष्ट्र आणि गुजरात राज्यात आहेत. तर एकूण साडे आठ लाखांपेक्षा जास्त सहकारी संस्था देशात कार्यरत आहेत आणि सहकारी संस्थांचे सर्व व्यवहार आणि आर्थिक व्यवहार केवळ सहकारी बँकाच्या माध्यमातून करण्यात येणार आहेत. सर्व राज्यात सहकाराचे तत्त्व लागू करण्यात येणार आहे. तरच सहकार क्षेत्र आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर होणार आहे, असे ते म्हणाले.

**पीएसीएसमध्ये व्यावसायिकता आणणार**

देशातील प्रत्येक पंचायतीमध्ये एक पीसीएस स्थापन करण्यात येणार आहे असे स्पष्ट करून ते म्हणाले, पीएसीएसच्या व्यवहार्यतेसाठी आदर्श उपनियम तयार करण्यात आले असून सर्व राज्यांनी ते स्वीकारले आहेत. यामुळे नवीन उपक्रम सुरू करता येणार आहे. पीएसीएसमध्ये व्यावसायिकता आणून सर्व सहकारी क्षेत्राला बळकटी देण्याचा हा प्रयत्न असणार आहे.

**साखर निर्यातीच्या निर्णयाचा फायदा कारखान्यांना**


सहकार मंत्रालयाची स्थापना आणि साखर कारखान्यांच्या कराच्या प्रश्नांसारख्या समस्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीच सोडवल्या आहेत, असे नमूद करून ते म्हणाले, इथेनॉलमुळे साखर कारखान्यांचा नफा वाढला आहे. साखरेला चांगला भाव मिळावा, यासाठी सरकारने १० लाख टन साखर निर्यात करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचा फायदा राज्यातील साखर कारखान्यांना होणार आहे. सहकारी संस्था अधिक प्रमाणावर विकसित होण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. त्यात प्राथमिक कृषी पतसंस्था, दूध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय, नागरी सहकारी बँका, गृहनिर्माण संस्था, खादी ग्रामोद्योग आणि पतपुरवठा करणाऱ्या संस्था या सात प्रमुख क्षेत्रांत क्रमवारीनुसार वाटचाल करण्यात येणार आहे. असेही त्यांनी नमूद केले.

तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी 'जय जवान जय किसान' असा नारा दिला होता असे नमूद करून ते म्हणाले, मात्र आता पंतप्रधान मोदी यांनी 'जय जवान, जय किसान, जय विज्ञान' असा नारा दिला आहे. यामध्ये शेतकरी हा केंद्रबिंदू ठेवला आहे. सहकार आणि विज्ञान एकत्र आले तर शेती क्षेत्र नक्की फायद्याचे होणार आहे. तसेच सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र सरकार सर्वतोपरी मदत करेल, असे ते म्हणाले.

सहकार क्षेत्रातील एखादी संस्था चुकीची वागली तर अन्य संस्थांचे नाव खराब होते असे नमूद करून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, हे टाळण्यासाठी सहकार चळवळीतील संस्थांनी पारदर्शकपणे काम करीत पुढे जाण्याची आवश्यकता आहे. केंद्र सरकारच्या सहकार मंत्रालयामुळे नजीकच्या काळात देशातील सर्व गावांत सहकार संस्थांचे जाळे अधिक मोठ्या प्रमाणावर विणले जाईल. या सहकार चळवळीत अग्रेसर राहण्यासाठी महाराष्ट्र राज्य प्रयत्नशील राहील, असे ते म्हणाले.

***

# देशभरात सहकार भारतीच्या विस्ताराबरोबरच प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करणार : सहकार भारती राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी



आगामी काळात देशाच्या विविध राज्यांत सहकार भारतीच्या कार्याचा विस्तार करण्या बरोबर नजीकच्या काळात नव्याने उभ्या राहणाऱ्या सहकारी संस्थांसाठी प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देण्यावर अधिक भर असणार आहे असे सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी यांनी विशेष मुलाखतीमध्ये सांगितले.

डॉ. जोशी यांची नुकतीच सहकार भारतीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली. त्यानंतर त्यांनी विषेश मुलाखतीमध्ये सहकार भारती आणि एकूणच सहकार क्षेत्राविषयी मते मुलाखतीच्या माध्यमातून मांडली आणि आगामी काळातील योजनांचे सुतोवाच केले. सहकार भारतीच्या विस्तार कार्याबाबत ते म्हणाले, आजमितीस देशातील २८ राज्य आणि ६५० जिल्ह्यांत विस्तार झाला आहे आणि सहकार भारतीच्या स्थापनेला ४७ वर्ष पूर्ण झाली आहेत. त्यानिमित्त यापुढील काळात भौगोलिक विस्तारावर अधिक प्रमाणात भर देण्यात येणार आहे. याबरोबर संस्थात्मक स्तरावरदेखील विस्तार करण्याचे उद्दिष्ट  नक्की करण्यात आले आहे. आजमितीला देशात ५५ विविध प्रकारच्या सहकारी संस्था कार्यरत आहेत. त्या प्रत्येक क्षेत्रात सहकारी संस्था उभारणी आणि कार्यकर्ता संमेलन याचे आयोजन करण्यात येत आहे. असे असले तरी प्रत्येक जिल्ह्यांत सहकार भारतीचे काम सुरू झाले पाहिजे यावर भर असणार आहे.

**✻ सहकार भारतीची प्रशिक्षणाची सुविधा –**

देशाला पांच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनविण्याचे उद्दिष्ट मोदी सरकारने नक्की केले आहे. यामध्ये सहकार भारतीची भूमिका कशी असणार या प्रश्नाल उत्तर देताना त्यांनी सांगितले की, पंतप्रधान मोदी यांनी सन २०२१ मध्ये ''सहकारीतासे समृद्धि'' असा नारा दिला आहे. सध्याच्या स्थितीत देशाच्या विविध राज्यात एकूण आठ लाख ६० हजार सहकारी संस्था कार्यरत आहेत. यामध्ये ५० टक्के संस्था या गृहनिर्माण सहकारी संस्था आहेत आणि अंदाजे २९ कोटी लोकसंख्या या संस्थांशी जोडली गेली आहे. एका बाजूने उद्योग क्षेत्र झपाट्याने विकसित होत असताना ही विकासाची गंगा समाजातल्या शेवटच्या घटकापर्यंत जाण्यासाठी सहकार क्षेत्राखेरीज अन्य पर्याय नाही. हे लक्षात आल्याने केंद्र सरकारने विविध क्षेत्रामध्ये सुमारे दहा हजार सहकारी संस्था उभारणीचे उद्दिष्ट ठेवले आहे. या नवीन संस्थांसाठी आवश्यक त्या प्रशिक्षणाची सुविधा आणि नवीन संस्था उभारणे यासाठी सहकार भारती कार्यरत राहणार आहे .

**विशेष मुलाखत**

**✻ सहकार क्षेत्राच्या विस्तारीकरणावर विशेष भर –**

महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राविषयीचे भाष्य करतांना ते म्हणाले, सुरूवातीपासून महाराष्ट्र हे सहकार क्षेत्रात आघाडीवर राहिले आहे आणि त्यातही पश्चिम महाराष्ट्रात सहकार क्षेत्रातील महत्त्वाच्या नेत्यामुळे सहकार चळवळीला बळ मिळाले आहे. बदलत्या गरजा आणि काळानुसार विविध क्षेत्रात सहकार क्षेत्र अधिक प्रमाणात विकसित होत आहे. मुंबईतील वेगवान विश्वामुळे सहकार क्षेत्र रुजण्यासाठी मर्यादा असल्या तरी कोकण विदर्भ, मराठवाड्यात सहकाराचे तत्त्व पोहोचविण्यासाठी सहकार भारतीचे कार्यकर्ते जोमाने काम करीत आहेत. गुजरातमधील अमूलचा विचार करायचा झाला तर या ब्रँडशी असंख्य शेतकरी जोडले आहेत. अमूलची दुध संकलन क्षमता देखील खूप मोठी आहे म्हणजेच ती आठ कोटी इतकी आहे. महाराष्ट्राचा विचार करता अनेकविध दुधाचे ब्रँड प्रचलित आहेत. मात्र अजूनही ते अमूलची उंची गाठू शकले नाहीत हे वास्तव आहे. त्यामुळे या क्षेत्रात राज्याला आणखी काम करण्याची संधी आहे.

**✻ सहकारी साखर कारखान्यांबाबत सहकार भारतीचा प्रस्ताव –**

सहकारी साखर उद्योगाबाबत विचारता ते म्हणाले, सहकारी साखर उद्योग हा देशातील एक महत्वाचा असा उद्योग आहे. ग्रामीण भागाचा विकास आणि उभ्या राहिलेल्या पायाभूत सुविधा यामागे सहकारी साखर कारखाने आहेत हे लक्षात घ्यायला हवे. मात्र या क्षेत्रात देखील राजकीय भूमिकेने प्रवेश केला आहे आणि एक अनिष्ट प्रथा सुरू झाली आहे. चांगल्या स्थितीत असणाऱ्या सहकारी साखर कारखान्याचा ताळेबंद खराब करायचा आणि मग तो डबघाईला आला की मग खासगी क्षेत्राला विकायचा. मग तो चांगला चालायला लागतो. यामुळे अनेक सहकारी साखर कारखाने बंद पडले आहेत. याबाबत सहकार भारतीने सरकारला एक प्रस्ताव पाठविला आहे. असा एखादा साखर कारखाना बंद पडला की, तो एखाद्या सहकारी संस्थेला विकण्यात यावा. जेणेकरून त्याची मालकी सहकार क्षेत्राकडे राहील. उत्पादन खर्च कमी करण्यासाठी कच्ची साखर विकणे, इथेनोल उत्पादन, सहविजनिर्मिती यासारखे प्रयोग सहकार भारतीच्या माध्यमातून सुरू झाले आणि यशस्वी होत आहेत, असे ते म्हणाले.

**✻ जुन्या इमारतींचा पुनर्विकास प्रश्न महत्त्वाचा –**

राज्याच्या विविध भागातील महत्वाचा प्रश्न म्हणजे जुन्या इमारतींचा पुनर्विकास होय. याबाबत विचारता ते म्हणाले, सहकार क्षेत्रातील एकूण संस्थांपैकी अर्ध्या संस्था या गृहनिर्माण संस्था आहेत. आणि या संस्थांचा महत्वाचा प्रश्न म्हणजे या संस्थांच्या सभासदांचा असहकार होय. त्यापुढे आणखी एक बाब म्हणजे स्वयंपुनर्विकास योजनेसाठी बँकाकडून कर्जाची उपलब्धता होणे आवश्यक आहे. तसेच जागाहस्तांतर हादेखील एक प्रश्न आहे. याबाबत सहकार भारतीने समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केला आहे आणि यापुढील काळात देखील सतत पाठपुरावा करण्याची सहकार भारतीची भूमिका असणार आहे, असे त्यांनी नमूद केले.

**✻ नवीन तंत्रज्ञानाच्या वापरासाठी आग्रही भूमिका –**

प्रशिक्षणाच्या प्रक्रियेबाबत सांगताना ते म्हणाले, सहकार भारतीने माहिती तंत्रज्ञान आणि सायबर सिक्युरिटी सेल, या दोन्हीच्या माध्यमातून सहकारी संस्थांना प्रशिक्षण देणे तसेच संस्थांनी नवीन तंत्रज्ञानाचा अधिकाधिक प्रमाणात वापर करावा यासाठी सहकार भारतीच्या वतीने प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देत आहे. कारण या विषयाची व्याप्ती खूप मोठी आहे. या विषयावरील जागृतीसाठी सहकार भारती प्रयत्नशील आहे आगामी काळात हे सेल प्रत्येक विभागात स्थापन करण्याचा सहकार भारतीचा प्रयत्न आहे असे त्यांनी सांगितले.

# अर्थसंकल्पातील सहकार क्षेत्राच्या तरतुदींबद्दल संमिश्र प्रतिक्रिया

**❊ विकास संस्था व सहकार खात्याच्या संगणकीकरणावर भर –**



केंद्र सरकारच्या नुकत्याच सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात ग्रामीण भागातील विकास सहकारी संस्था तसेच केंद्र आणि राज्य शासनाच्या अखत्यारीत असणाऱ्या सहकार कार्यालयाचे संगणकीकरणावर विशेष भर देण्यात आला आहे आणि त्यासाठी वाढीव तरतूद देखील करण्यात आली आहे. मात्र सहकार क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी सुचविण्यात आलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष झाले आहे. तसेच सहकार क्षेत्राच्या विकासासाठी कोणतीही भरीव तरतूद करण्यात आली नाही.

**– डॉ. उदय जोशी, राष्ट्रीय अध्यक्ष, सहकार भारती**

---

**❊ सर्व समावेशक अर्थसंकल्प –**

अर्थसंकल्पाचे वर्णन सर्वसमावेशक अर्थसंकल्प असे करता येईल. या अर्थसंकल्पात समाजातील प्रत्येक घटकाला काही ना काही देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

किसान क्रेडिट कार्डची मर्यादा पाच लाख रुपयांपर्यंत वाढवून शेतकरी वर्गाला मोठ्या प्रमाणावर दिलासा देण्यात आला आहे.

**– अभय मंडलिक, बँकिंग तज्ञ**

---

**❊ ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करणारा अर्थसंकल्प –**

ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करणारा अर्थसंकल्प केंद्र सरकारने सादर केला असून सहकार क्षेत्राला बळकटी देणारा आहे. ग्रामीण भागात सहकार क्षेत्राचा मोठा वाटा असून देशाची अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी अर्थसंकल्पात सहकाराला विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. त्यासाठी ११८६ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच संगणकीकरणावर भर देताना ५६० कोटीची तरतूद करण्यात आली आहे आणि राष्ट्रीय सहकार विभाग निगमसाठी ५०० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

**– विवेक जुगादे, महामंत्री, प्रदेश सहकार भारती**

---

**❊ जिल्हा आणि सहकारी बँक सक्षम होतील –**

ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होण्याच्या दिशेने सरकारची वाटचाल होत असून सहकार क्षेत्रातील त्रिस्तरीय पतसंरचना सुदृढ होईल. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ झाल्याने विविध कार्यकारी संस्था आणि राज्य सहकारी बँका सक्षम होतील. तसेच अडचणीतील सहकारी संस्थांना फायदा होऊ शकेल. यंदाचे वर्ष हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून युनोने जाहीर केले आहे. त्यामुळे सहकार क्षेत्राच्या सक्षमीकरणासाठी थेट सवलती मिळतील अशी अपेक्षा होती. राष्ट्रीय सहकार विकास महामंडळास सरकारने वित्तपुरवठा करण्याचे धोरण स्विकारले आहे. त्यामुळे सर्व सहकारी संस्थांना त्याचा फायदा होईल.

**–विद्याधर अनास्कर, राज्य सहकार बँक प्रशासकीय मंडळ अध्यक्ष**

---

**❊ किसान क्रेडिट कार्डची मर्यादा वाढविली –**

किसान क्रेडिट कार्ड योजनेची मर्यादा तीन लाख रूपयावरून पांच लाख रुपये करण्याचा निर्णय स्वागतार्ह असून यामुळे सध्याची नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना तीन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज शून्य टक्के दराने उपलब्ध होणार आहे. राज्य शासनाने अर्थसंकल्पात पांच लाख पीक कर्ज शून्य टक्के दराने उपलब्ध होण्यासाठी तरतूद करावी त्यामुळे शेतीला अर्थपुरवठा वाढविण्यात यश येणार आहे,

**– प्रा. दिगंबर दुर्गाडे, अध्यक्ष, पुणे जिल्हा सहकारी बँक**

---

**❊ साखरेचा किमान विक्री दर इथेनॉल खरेदी बाबत सुतोवाच नाही–**

साखरेचा किमान विक्री दर आणि इथेनोल खरेदी याबाबत अर्थसंकल्पात कोणतेच सुतोवाच झाले नाही. त्यामुळे सहकार क्षेत्रातला मोठा उद्योग असणाऱ्या साखर उद्योगाची निराशा झाली आहे. तसेच ऊसतोडणी मजुरांचे प्रश्न ऊस तोडणी यंत्र अनुदान याबाबत दिलासा नाही. साखर उद्योगाच्या हाती काहीच लागले नाही. ऊस शेतीमध्ये एआयच्या वापरासाठी करण्यात आलेल्या आर्थिक तरतुदीचा निर्णय चांगला आहे.

**– संजय खताळ, राज्य सहकारी साखर कारखाना संघ व्यवस्थापकीय संचालक**

---

**❊ ऊस तोडणी यांत्रिकीकरणांबाबत भाष्य ?**

कृषि क्षेत्राबाबतच्या घोषणा आशादायक असूनही साखर उद्योगाची निराशा झाली आहे. बायो सीएनजी आणि इथेनॉल या प्रदूषण विरहित इंधनावर चालणाऱ्या वाहनांना जीएसटी करात सवलत देण्याची मागणी जुनी आहे. त्यावर निर्णय नाही. उसाची एफआरपी वाढत असतांना गेली पांच वर्षे साखरेच्या किमान विक्री दरात वाढ झाली नाही. इथेनॉल किंमत लिटर मागे ५ रुपयांनी वाढणे आवश्यक होते, पण त्याबाबत काही झाले नाही.

**– बी. बी. ठोंबरे, अध्यक्ष –विस्मा.**

---

**❊ सवलत अपेक्षित होती –**

सहकारी साखर कारखाने, सहकारी बँका, पतसंस्था, ग्राहक भांडारे यांना अर्थसंकल्पात काही प्रमाणात सवलती अपेक्षित होती. मात्र त्याबाबत प्रत्यक्ष काही झाले नाही.

**– सूर्यकांत पाठक, कार्यकारी संचालक ग्राहक पेठ**

---

**❊ दुग्धजन्य पदार्थावरील करात सवलत नाही –**

अर्थसंकल्पात दुग्धजन्य पदार्थावरील जीएसटी करात कोणतीच सवलत देण्यात आली नाही अथवा कोणतीही घोषणा नाही. त्यामुळे दुग्ध व्यवसायाचा अपेक्षाभंग झाला आहे. शेतीला प्रोत्साहन देणारा हा व्यवसाय करमुक्त होण्यासाठी धोरणात्मक निर्णय होणे अपेक्षित होते. खरे तर दूध उत्पादक शेतकऱ्यांना बळकटी देण्याची गरज होती. कारण हा हा व्यवसाय शेतीला जोडधंदा म्हणून पहिलं जातो.

**– गोपाळ म्हस्के, अध्यक्ष राज्य सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघ**

---

**❊ सकारात्मक अर्थसंकल्प –** केंद्र सरकारने नुकताच सादर केलेला अर्थसंकल्प हा सकारात्मक असूनही सहकार क्षेत्राबाबत अथवा जीएसटीबाबत काही स्वतंत्र घोषणा होणे अपेक्षित होते, मात्र तसे काही झाले नाही. याखेरीज अन्य विषयावरील तरतुदी योग्य आहेत.

**– सुशील जाधव, लोकमान्य मल्टिपर्पज सोसायटी पुणे विभाग प्रमुख.**

❊❊❊❊❊

# सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशच्या माजी अध्यक्षा डॉ. शशिताई अहिरे यांचे निधन



**नाशिक –** सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशच्या माजी अध्यक्षा तसेच नाशिक जिल्हा रेणुकानगर नागरी सहकारी पतसंस्थेच्या सलग २० वर्षे संस्थापक अध्यक्ष डॉ. शशिताई अहिरे यांचे नुकतेच निधन झाले.

येथील रेणुकानगर पतसंस्थेच्या संस्थापक अध्यक्ष आणि रेणुकानगर गृहनिर्माण संस्थेच्या अध्वर्यू म्हणून त्यांना ओळखले जाते. नाशिक जिल्हा महिला सहकारी बँकेच्या त्या प्रदीर्घ काळ संचालक व अध्यक्ष होत्या. सहकार, दिव्यांग विद्यार्थी, महिला, अनाथ मुले अशा विविध क्षेत्रातील त्यांचे काम वाखणण्याजोगे आहे.

सहकार भारती प्रदेशच्या आळंदी येथील अधिवेशनात प्रदेश अध्यक्षपदी डॉ. शशिताई अहिरे यांची निवड झाली होती.त्यांचे सुपुत्र नरेश हे बांधकाम व्यावसायिक असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नाशिक शहर व्यवस्था प्रमुख आहेत. हरसूल येथील विश्व हिंदू परिषदेचे जनजाती कन्या छात्रालय प्रारंभ होण्यापूर्वी साप्ताहिक आरोग्य केंद्र सुरू होते. मेरी कॉलनीत त्या वैद्यकीय सेवा देत असत.

नाशिक जिल्हा आयुर्वेद संमेलन आणि महाराष्ट्र आयुर्वेद संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. तसेच अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलनाच्या त्या अनेक वर्षे उपाध्यक्ष आणि संघटन प्रमुख होत्या. कामगार कल्याण मंडळ आणि शासकीय संस्थामध्ये त्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. त्याबरोबर आयुर्वेद प्रसाराचे काम मोठ्या प्रमाणावर केले आहे.

# सहकार भारतीच्या संघटनात्मक बांधणीसाठी अखेरपर्यंत डॉ.शशिताई अहिरे यांचे योगदान - सतीश मराठे

**नाशिक –** सहकार भारतीच्या संघटनात्मक बांधणीसाठी अखेरपर्यंत कार्यरत असणाऱ्या आणि समाजातील सर्वच घटकांच्या प्रगतीसाठी काम करणाऱ्या डॉ. शशिताई अहिरे यांच्या निधनामुळे सर्वांना त्यांची उणीव कायमच जाणवणार आहे, अशी भावना आरबीआय संचालक सतीश मराठे यांनी व्यक्त केली.

डॉ. अहिरे यांचे नुकतेच निधन झाले. त्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या शोकसभेत ते बोलत होते. ठाणे जनता सहकारी बँक अध्यक्ष शरद गांगल, राज्य सहकारी बँक असोसिएशन अध्यक्ष विश्वास ठाकूर, राज्य सहकारी पतसंस्था महासंघ अध्यक्ष काका कोयटे, रा. स्व. संघाचे श्रीकृष्ण घरोटे, सहकार भारती प्रदेश संघटन मंत्री शरद जाधव, डॉ. अहिरे यांच्या कन्या लिना अहिरे, सिन्नर सहायक निबंधक संजय गीते, रिमांड होम सचिव चंदुलाल शहा उपस्थित होते.

मराठे यांनी सांगितले की, बँकेच्या कामाची बैठक असो की, सहकार भारतीचे संघटनात्मक काम तसेच सर्व प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत आणि देशातील विविध भागात कार्यरत असणाऱ्या महिला बँकांना मार्गदर्शन करण्याची आवश्यकता होती. त्याकाळात डॉ. अहिरे यांनी भरपूर प्रवास केला. याबरोबर सामान्यातल्या सामान्य व्यक्तीबरोबर सहजगत्या त्या जोडल्या जात आणि सर्वांना बरोबर घेऊन काम करण्याची त्यांची मानसिकता होती. कोणतीही गोष्ट साध्या, सरळ, सोप्या भाषेत मांडण्याची कला त्यांच्यामध्ये होती. सहकार भारतीच्या प्रदेश अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले आणि गरजूंना उद्योग व्यवसाय उभारणीत हातभार लावला.

राज्य सहकारी बँक असोसिएशन अध्यक्ष विश्वास ठाकुर यांनी सांगितले की, ताईंच्या जाण्याने सर्वांना दु:ख झाले आहे. त्यांनी सहकारी बँकिंग क्षेत्रात मोलाची कामगिरी केली



आहे. तसेच नाशिक जिल्हा महिला सहकारी बँकेची स्थापना करून प्रदीर्घ काळ अध्यक्ष पद भूषविले आणि बँकेला नवी उंची मिळवून दिली. नागरी सहकारी बँक महासंघ, नाशिक जिल्हा बँक असोसिएशन आणि जिल्हा बँक फेडरेशनमधे त्यांनी अध्यक्ष म्हणून काम केले आहे. समाजातील विविध घटकांना सहकाराच्या क्षेत्रात सामावून घेत त्यांच्या आर्थिक प्रगतीत हातभार लावला. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी प्रयत्न केले.

संघटन मंत्री जाधव यांनी सांगितले की, शशिताई म्हणजे मातृतुल्य व्यक्तिमत्व होते. सहकार क्षेत्रात त्यांनी मोठे काम केले रेणुका नागरी सहकारी पतसंस्था आणि रेणुका गृहनिर्माण संस्था त्यांनी सुरू केली. विशेष म्हणजे सहकार क्षेत्राच्या पलीकडे जाऊन त्यांनी काम केले. वैद्यकीय व्यवसाय हा समाज हितासाठी केला. त्याचप्रमाणे सहकार भारतीच्या कार्यासाठी त्यांनी उल्लेखनीय असे काम केले आहे.

पतसंस्था महासंघ अध्यक्ष कोयटे यांनी सांगितले की, डॉ. अहिरे यांच्या जाण्यामुळे पतसंस्था चळवळीचे मोठे नुकसान झाले आहे तर राज्य पतसंस्था महासंघ अध्यक्ष अजय ब्रम्हेचा म्हणाले की, त्यांचे नेतृत्व आणि कर्तृत्व मोठे होते. जे काम करायचे आहे, ते पूर्ण करण्याचा त्यांचा दृढ निर्धार असायचा. प्रत्येक कामात त्यांचा समर्पण भाव असायचा. रा.स्व.संघाचे घरोटे म्हणाले की, सर्वांना सांभाळून घेणारे मातृतुल्य व्यक्तिमत्व कायमचे आपल्यातून निघून गेले आहे. त्यांनी विविध क्षेत्रातील कामाचा आदर्श स्वत:च्या कृतीमधून दिला आहे.

ठाणे जनता सहकारी बँक अध्यक्ष शरद गांगल म्हणाले, सहकार असो की बँकिंग तसेच अन्य क्षेत्रात डॉ. अहिरे यांनी कामाचा आदर्श घालून दिला आहे आणि सर्वांना प्रोत्साहन देण्याचे महत्वपूर्ण असे काम केले आहे. महिला बचत गट महासंघाच्या अध्यक्ष अश्विनी बरिस्ते, चंदूलाल शहा, आयुर्वेद सेवा संघ अध्यक्ष आशुतोष यार्दी यांनी मनोगते व्यक्त केली. गोदावरी सहकारी बँक संचालक वसंतराव खैरनार यांनी सूत्रसंचालन केले.

डॉ. अहिरे यांच्या कार्याचा आढावा घेणारी मनोगते व्यक्त करण्यात आली.

# सहकारातून, सामाजिक कार्याचा वसा जोपासणाऱ्या; डॉ. शशिताई अहिरे



सहकार चळवळीत समाजातील तळागाळातील जनतेला सामावून घेऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणून त्यांचे आर्थिक सबलीकरण होण्यासाठी शशिताईंनी आयुष्यभर प्रयत्न केले व त्यांना यशही आले. महिलांना आर्थिक सबल करण्यासाठी त्यांच्या सक्षमीकरणासाठी मूलभूत स्वरूपाच्या योजना महिलांपर्यंत नेल्या. दुर्गम भागातील आदिवासी महिलांसाठी बचत गटांची निर्मिती करून उद्योग व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून दिल्या व त्यांना सन्मानाने जगण्याचा कृतीशील मंत्र दिला.

दि नाशिक जिल्हा महिला सहकारी बँकेच्या माध्यमातून महिलांसाठी आर्थिक निर्भरतेसाठी प्रयत्न केले आणि महिला बँकेला सहकार क्षेत्रात नावलौकिक प्राप्त करून दिला. शशिताईंनी सहकारात मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि प्रशिक्षण याविषयी जागृती केली. रेणुका नागरी सहकारी पतसंस्थेच्या संस्थापक अध्यक्षा म्हणून त्यांनी अनेकांना आर्थिक योजनांच्या माध्यमातून मदत केली.

याचबरोबर सहकार क्षेत्रातील राज्य, राष्ट्रीय पातळीवरील अनेक जबाबदाऱ्या त्यांनी अभ्यासपूर्णपणे पार पाडल्या. महाराष्ट्र सहकार भारतीच्या प्रदेश अध्यक्षा म्हणून सहकार क्षेत्रातील संघटनात्मक बांधणीसाठी प्रयत्न केले. सहकार क्षेत्रातील आधुनिक बदलांविषयी प्रशिक्षण कार्यशाळा, शिबिरे आयोजित केली.

दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेडरेशन लि., मुंबईच्या संचालिका म्हणून नागरी सहकारी बँकांच्या अडी-अडचणी सोडवण्यासाठी राज्य व केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला. एका आयुष्यात किती जबाबदाऱ्या आणि त्याही समर्थपणे पार पाडता येतात हे त्यांच्याकडे पाहून लक्षात येते. वेळेबाबत काटेकोरपणा, गुणग्राहकता, निर्णयातील स्पष्टता, नाविन्याचा ध्यास हे शशिताईंच्या व्यक्तिमत्त्वाचे गुणवैशिष्ट्य होते.

नाशिक जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशनच्या संचालिका म्हणून त्यांचे मार्गदर्शन आम्हाला कायमच दिशादर्शक ठरले. नाशिक येथे २०११ व २०२४ मध्ये झालेल्या 'महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँक्स् परिषद' या राज्यस्तरीय परिषदेत शशिताईंनी मार्गदर्शक सूचना केल्या व सहकार परिषद यशस्वी होण्यासाठी आधारस्तंभ म्हणून आमच्यात ऊर्जा निर्माण केली. सहकार परिषदेतील त्यांचे कामाप्रती वाहून घेणे हे आमच्या कायमच स्मरणात राहील.

समोरच्या व्यक्तीचे बोलणे नीट समजून घेऊन प्रश्नांची सोडवणूक करण्याचे कौशल्य त्यांनी आत्मसात केले होते. त्यामुळे लोकसंग्रह जपला होता. कुठल्याही विकासात्मक कामासाठी खंबीरपणे उभे राहणे, आत्मविश्वास निर्माण करणे हे ताईच्या व्यक्तिमत्त्वाची बाजू आहे.

सहकाराबरोबरच सामाजिक बांधिलकीही त्यांनी जोपासली होती. दिव्यांग महिला, अनाथ मुले यांच्यासाठी त्यांनी सेवाभावी वृत्तीने काम केले.

शशिताईंची समाजाप्रती, सहकार क्षेत्राविषयी असलेली तळमळ नेहमीच आम्हाला बळ देत राहील.

**– विश्वास लिलावती जयदेव ठाकूर**

संस्थापक अध्यक्ष-विश्वास को-ऑप. बँक लि.,
नाशिक अध्यक्ष-दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक्स असोसिएशन
लि., मुंबई, माजी अध्यक्ष तथा संचालक-दि नाशिक जिल्हा नागरी
सहकारी बँक्स असोसिएशन लि., नाशिक

# स्वयंपुनर्विकास योजनेसाठी राज्य सहकारी बँकेचा दीड हजार कोटींचा निधी

**मुंबई –** मुंबई बँकेच्या पुढाकाराने होत असणाऱ्या स्वयंपुनर्विकास योजनेसाठी राज्य सहकारी बँक दीड हजार कोटी रूपयांचा निधी उपलब्ध करून देणार आहे, असे बँकेच्या प्रशासकीय मंडळाचे अध्यक्ष विद्याधर अनास्कर यांनी सांगितले. तसेच मुंबई बँकेच्या सहकार संकुलासाठी ५० हजार कोटींची तरतूद करण्यात येईल, असे राज्याचे सहकार राज्यमंत्री पंकज भोयर यांनी जाहीर केले.

गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या स्वयंपुनर्विकास योजनेसंदर्भात येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत वरील निर्णय जाहीर करण्यात आले. सहकार राज्यमंत्री भोयर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीतील निर्णयांची माहिती राज्यमंत्री भोयर सांगताना म्हणाले की, योजनेकडे गृहनिर्माण सहकारी संस्थांचा कल वाढतो आहे. आजवर सुमारे २१८ कोटींचे कर्ज मुंबई बँकेकडून देण्यात आले आहे. पण या बँकेला मर्यादा आहेत. बँकेकडे आजवर सुमारे १६०० प्रस्ताव आले आहेत. यासाठी राज्य सहकारी बँकेचे सहकार्यदेखील मिळाले आहे. अन्य सहकारी बँकांचे सहकार्य मिळाले तर मोठी मदत होणार आहे.

अनास्कर म्हणाले की, योजनेसाठी बँकेच्या वतीने दीड हजार कोटी देणार आहे. मुंबई, ठाणे आणि अन्य भागांतून जितके प्रस्ताव येतील. ते निकाली काढण्याचा प्रयत्न असणार आहे. यासाठी सर्व बँकांना एकत्र करून त्याचे नेतृत्व मुंबई बँकेने करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



डॉ. भोयर
सहकार राज्यमंत्री

राज्याच्या विविध जिल्ह्यांत सहकारी गृहनिर्माण संस्थांची संख्या वेगाने वाढत असून या संस्थांना आवश्यक त्या बाबींसाठी कर्जाची उपलब्धता भविष्यामध्ये जाणवू शकते. त्यामुळे त्याबाबतही सकारात्मक दृष्टीकोनातून विचार करण्याचा प्रयत्न केला जाईल.

या कार्यक्रमाला सहकार खात्याचे शासकीय अधिकारी तसेच बँकेचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या संदर्भात विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

# देशाच्या सर्वांगीण विकासाच्या प्रक्रियेत सहकार क्षेत्राचा मोठा वाटा - डॉ. उदय जोशी



**मुंबई –** देशाच्या सर्वांगीण विकासाच्या प्रक्रियेत सहकार क्षेत्राचा मोठा वाटा असून समाजातील सर्वच घटकांचा विकास होण्यासाठी सहकार क्षेत्राशिवाय पर्याय नाही, असे सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी यांनी येथे सांगितले. सहकार भारतीच्या वर्धापन दिनानिमित्त सहकार भारती नवी मुंबई आणि पनवेल महानगराच्या वतीने सहकार संवाद कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते.

सहकार भारतीचे संस्थापक सदस्य आणि आरबीआय संचालक सतीश मराठे, प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, हावरे ग्रुपचे अध्यक्ष सुरेश हावरे, सिडकोचे निबंधक सहकारी संस्था प्रताप पाटील, नवी मुंबई सहकार भारती अध्यक्ष प्रमोद जोशी यावेळी उपस्थित होते. डॉ. जोशी यांनी सांगितले की, राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांना अनेक प्रश्न भेडसावत आहेत. त्याच्या विचार मंथनासाठी कार्यशाळा होणे गरजेचे होते.

सहकारी गृहनिर्माण संस्थांनी काम करीत असताना समोर असणाऱ्या विविध प्रश्नांवर उत्तर शोधण्याची आवश्यकता आहे. यामध्ये सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे पर्यावरणीय बदल लक्षात घेऊन त्यामधून मार्ग काढण्याची गरज आहे. या कार्यशाळेच्या निमित्ताने बचत गटांच्या माध्यमातून वस्तूंचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. तसेच यावेळी गृहनिर्माण संस्थांच्या कायदेशीर बाबी, दैनंदिन कामकाज, लेखा परीक्षण, हस्तातरण पुनर्विकास अशा विविध विषयांवर त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

---

# विकास सोसायटी ते जिल्हा बँक साखळी बळकट करण्याची गरज : केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ

**मुंबई –** ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक सक्षम होण्यासाठी त्या त्या गावातील विकास सहकारी सोसायट्या सक्षम होणे गरजेचे आहे. यासाठी विकास सोसायटी ते जिल्हा बँक ही साखळी बळकट करण्याची गरज आहे, असे केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले. राज्य सहकारी बँकेच्या वतीने आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांचे उद्घाटन मोहोळ यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

बँकेची सहकार गॅलरी, नवे बोधचिन्ह, नवा ध्वज आणि बँकेच्या सहकार गीताचे अनावरण करण्यात आले. राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, राज्यमंत्री पंकज भोयर, मुंबई जिल्हा बँक अध्यक्ष प्रवीण दरेकर, बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर, जयंत पाटील यावेळी उपस्थित होते. ते म्हणाले, 'केंद्र आणि राज्य यांच्यातील समन्वयातून राज्यातील सहकार क्षेत्रातील विविध अडचणींवर मार्ग काढता येणे शक्य आहे. ग्रामीण भागातील विकास सेवा सोसायटी विविध क्षेत्रात काम करू शकणार आहेत. यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक बळकट होण्यास हातभार लागणार आहे. जिल्हा सक्षम होण्यास मदत होणार आहे.' सोसायटींच्या संगणकीकरणाची प्रक्रिया सध्या सुरू आहे. यामुळे व्यवहार पारदर्शक, सुरळीत आणि सोपे होणार आहेत.सहकाराचे प्रशिक्षण देण्यासाठी नजीकच्या काळात सहकार विद्यापीठ सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. याबाबतचे विधेयक संसद अधिवेशनात मंजूर होईल, असे ते म्हणाले.

सहकार मंत्री पाटील यांनी सांगितले की, जिल्हा बँकांना ऊर्जितावस्था अधिक व्यापक प्रमाणावर यावी. तसेच सर्वसामान्यांचा सहभाग सहकाराच्या क्षेत्रात वाढावा यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. आरबीआयने सहकारी बँकांवर जे कडक आर्थिक निर्बंध लावले आहेत, याबाबत सहकारी बँकांनी आत्मचिंतन करावे, असा सल्ला त्यांनी दिला, तर प्रशासक अनास्कर यांनी सांगितले की, बँकेच्या विकासात कर्मचाऱ्यांचा सहभाग, वाटा मोठा आहे. सहकार क्षेत्रात काम करताना हेच तत्त्व अंगीकारले तर बँक अडचणीत येणार नाही.



**सहकार महर्षी ग्रंथ केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांना प्रदान करताना संपादक भालचंद्र कुलकर्णी. छायाचित्रात मध्यभागी राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील**

सहकार भारतीच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेला सहकार महर्षी ग्रंथ यावेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांना संपादक भालचंद्र कुलकर्णी यांनी भेट दिला.

# सहकारी संस्थांच्या माध्यमातून महिला सबलीकरण - सतीश मराठे

## समाजभूषण पुरस्कार श्रीमती चेतना सिन्हा यांना प्रदान



**सांगली** – सहकारी पतपेढ्या, बँका, विकास सोसायटी, दूध संस्था यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी करणेसाठी आणखी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करणे गरजेचे आहे. श्रीमती सिन्हा यांनी केलल्या कार्याबद्दल त्यांनी कौतुक केले व यापुढेही केंद्र सरकार मार्फत महिलांसाठी असलेले विविध उपक्रम खेड्यापर्यंत पोचवावेत असे रिझर्व बँक ऑफ इंडियाचे संचालक सतीश मराठे यांनी सांगितले.

जे. जी. पाटील मेमोरियल फौंडेशनतर्फे समाजभूषण पुरस्कार २०२४ माण देशी फौन्डेशन व माण देशी महिला सहकारी बँकेच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती चेतना सिन्हा यांना प्रदान करण्यात आला. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांचे हस्ते व रिझर्व बँक ऑफ इंडियाचे संचालक सतीश मराठे यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कार प्रदान करण्यात आला.रोख ५१ हजार रूपये, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

सांगली अर्बन बँकेच्या स्व.म.ह तथा अण्णा गोडबोले सभागृह येथे हा सोहळा उत्साहात झाला. फौन्डेशन सचिव श्री.एच.वाय. पाटील यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. आमदार सुधीर गाडगीळ, सत्यजित देशमुख, महापालिका आयुक्त शुभम गुप्ता, सांगली अर्बन बँकेचे अध्यक्ष गणेश गाडगीळ, राजारामबापू बँकेचे अध्यक्ष शामराव पाटील, महाराणी देवी अहिल्याबाई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. आर. एस. चोपडे उपस्थित होते.

आमदार देशमुख यांनी समाजासाठी आदर्शवत कार्य करणाऱ्या व्यक्तींचा समाजभूषण पुरस्काराने सन्मान करण्याच्या उपक्रमाचे कौतुक केले. सन्मानपत्र वाचन महेश कराडकर यांनी केले. डॉ. भवाळकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या कि, श्रीमती सिन्हा यांनी म्हसवड सारख्या ग्रामीण भागात महिलांना आर्थिकदृष्ट्या साक्षर करण्याचे जे कार्य केले आहे ते अत्यंत कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे.

सहकारी पतपेढ्या, बँका, विकास सोसायटी, दुध संस्था यांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी करणेसाठी आणखी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करणे गरजेचे आहे. श्रीमती सिन्हा यांनी केलल्या कार्याबद्दल त्यांनी कौतुक केले व यापुढेही केंद्र सरकार मार्फत महिलांसाठी असलेले विविध उपक्रम खेड्यापर्यंत पोचवावेत असे रिझर्व बँक ऑफ इंडियाचे संचालक सतीश मराठे यांनी सांगितले.

श्रीमती चेतना सिन्हा यांनी आपले मनोगत व्यक्त करताना माण देशी फौन्डेशन व माण देशी महिला सहकारी बँकेतर्फे सुरु असलेल्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती सांगितली. तसेच प्रतिकूल परिस्थितीत म्हसवड येथे काम कसे सुरु केले व माण देशी महिला सहकारी बँकेची स्थापना करताना कोणत्या अडचणी आल्या व त्यावर मात करून कशी मंजुरी मिळाली याची माहिती सांगितली. कृषी मंत्रालय येथे निवड झालेबद्दल डॉ. राजवर्धन किरण पाटील, लॉ परीक्षेत प्रथम क्रमाक मिळवणाऱ्या सना सलीम मुजावर आणि मधुरा विजय पाटील यांचाही सत्कार करण्यात आला. आभार मधुरा पाटील यांनी मानले.

## स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधी चर्चासत्रात विविध विषयांवर चर्चा

**हातकणंगले** – स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधी आणि ठेव विमा संरक्षण या महत्त्वपूर्ण विषयांवर तालुका ग्रामीण बिगरशेती सेवक संघटना, नागरी महिला, को-ऑप. क्रेडिट सोसायटी व सेवक पतसंस्था कर्मचारी संघटनेतर्फे चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

चर्चासत्रात संस्थेच्या विविध समस्यांवर चर्चा करून प्रभावी उपाययोजना यावर चर्चा करण्यात आली. प्रमुख पाहुणे म्हणून सहकार भारती, महाराष्ट्र प्रदेश महिला प्रमुख वैशाली आवाडे सहकार भारती कोल्हापूर विभाग सहसंघटक जवाहर छाबडा, सुधाकर पिसे, अनिल हजारे, महेश कडाले उपस्थित होते. संस्थेच्या समस्या समजून घेतल्या व उपस्थितांना मार्गदर्शन केले. स्थिरीकरण व तरलता सहाय्य निधी आणि ठेवींना विमा संरक्षण मिळवण्यासाठी शासनाकडून होणाऱ्या प्रयत्नांची माहिती सांगितली.

## बचत गटाच्या माध्यमातून महिलांच्या सबलीकरणाचा प्रयत्न

**हातकणंगले** – बचत गटाच्या माध्यमातून महिलांच्या सबलीकरणाचा आणि सक्षमीकरणाचा प्रयत्न व्यापक स्तरावर होण्याची आवश्यकता आहे, असे मत इचलकरंजी जिव्हाजी सहकारी बँक माजी अध्यक्ष अंजली बावणे यांनी येथे सांगितले.

येथील आबासाहेब पाटील रेंदाळ सहकारी बँक आणि लोककल्याण कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या महिला मेळाव्यात त्या बोलत होत्या. सरपंच सुप्रिया पाटील अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी तेजस्विनी पांचाळ, बँक अध्यक्ष अरुण महाजन, कमिटीचे उपाध्यक्ष अनिल विभूते आदी पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक कमिटी अध्यक्ष चंद्रकांत शिंगारे यांनी तर सूत्रसंचालन शुभांगी करडे यांनी तर बँक उपाध्यक्ष सत्यजित पाटील यांनी आभार मानले.


## लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने विविध क्षेत्रातील व्यक्ती सन्मानित

**पुणे** – आद्य मराठी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त विविध क्षेत्रातील व्यक्तींना लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सन्मानित करण्यात आले. संस्थेचे संचालक शिवाजी माळी, सल्लागार गजेंद्र साळुंके, विभागीय अधिकारी कमलाकर पाटील, शाखाधिकारी लक्ष्मी माळी, तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित होते.



# कर्ज देणाऱ्या सहकारी संस्थांना तंत्रज्ञानाचा लाभ
# एक नवीन दृष्टिकोन

**लेखांक १**



**अजित भाले**
**मो. ९१८००७७५५४५५**

संयुक्त राष्ट्रसंघाने वर्ष २०२५, हे जागतिक सहकार वर्ष म्हणून अधिकृत केले आहे. यासंबंधीची जागतिक पातळीची परिषद दिल्लीला नोव्हेंबर २०२४ महिन्यात आयोजित केली आहे. भारतात सहकारी क्षेत्राची वाटचाल जागतिक अभ्यासाचा विषय बनला आहे. नुकत्याच कोझिकोडे, केरळ येथे पार पडलेल्या जागतिक सहकारी युतीचे संमेलन, जगातल्या कानाकोपऱ्यातून सहकार क्षेत्रातील संशोधकाना आपली संशोधनपर माहिती मांडण्याची संधी मिळाली. या निमित्ताने मेट्टारेव सिस्टिम्सचा प्रतिनिधी या नात्याने मला कर्ज क्षेत्रातील बदलांविषयी बोलण्याची संधी मिळाली.

कर्ज संस्थांची, महाराष्ट्रातील खेडी, तालुके आणि शहरातल्या लोकांना सहजतेने वक्तशीर कर्ज उपलब्ध करून देण्यात खूपच मोठी आणि महत्वाची भूमिका आहे. पण, या संस्थांना अनेक आव्हानेदेखील पडतात. यातील एक महत्वाचे आव्हान म्हणजे कर्ज कोणाला द्यावे, प्रामाणिक कर्जदार कसा ओळखावा, कर्ज देतानाची माहिती कशी गोळा करावी आणि व्यवहाराचे व्यवस्थापन असे असावे आणि त्यासाठी कार्यक्षम अधिकारी कसे प्रशिक्षित करावेत आणि नेमावेत.

या सर्व प्रक्रियांमध्ये महत्वाची बाब म्हणजे सहकारी कर्ज संस्थांची तंत्रज्ञान स्वीकारण्यातील अनिच्छा. बरेचदा संस्थेच्या वाढत्या व्यापात पुढील वाढीचे रोपटे लावणे गरजेचे असते याकडे संस्थेचा काणाडोळा होऊ शकतो. अशीच एक बाब सुरुवातीच्या काळात योग्य असणारी आणि वाढत्या व्यवसायातही काही काळ चालू शकणारे अनौपचारिक व्यवस्थापन. बरेचदा, कामकाज योग्य चालल्यामुळे संस्था बदलास तयार नसते. आणि मग अतिशय चांगल्या आणि सामाजिक जाणिवेतून सुरू झाली. कर्ज संस्था, कर्ज थकबाकीमुळे कचाट्यात सापडते. अडचणीची बाब म्हणजे अशा थोड्याच पण अनपेक्षितपणे संस्थेच्या प्रतिमेला धक्का पोहोचू शकतो. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे संस्थेच्या सदस्यांनाही आर्थिक नुकसान होऊ शकते; त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ शकतो.

आणि म्हणून सहकार क्षेत्रात नियमितपणे आघाडीची भूमिका घेणाऱ्या महाराष्ट्राने आणि प्रत्येक कर्जसंस्थेने नवीन पायंडा पाडण्याची जबाबदारी घेतली पाहिजे. यात महाराष्ट्राच्या वाढत्या विकसनदरात क्षेत्राचे वाढते वजन अधोरेखित करण्याची आवश्यकता आहे.

माहितीच्या या युगात, तंत्रज्ञान ही मूलभूत गरज बनली आहे. सहकारी कर्ज संस्थांना जर वाढीव व्यवसाय आणि औपचारिक व्यवस्था बांधायची असेल तर तंत्रज्ञान वापराला फारसा पर्याय नाही. कर्ज देणाऱ्या संस्थांसाठी तंत्रज्ञानावर आधारित कर्ज मूल्यांकन यासाठी नवीन व्यवस्था बांधणे हा चांगले सभासद जोडणे आणि कर्ज थकबाकी कमी करणे यासाठी एक योग्य पर्याय आहे. अनेकदा सहकारी कर्ज संस्थांना तंत्रज्ञान स्वीकारण्याबाबत काळजी आणि नकारात्मक दृष्टिकोन असतो. याबाबतीत काही महत्त्वाचे मुद्दे विचारात घेतले पाहिजेत. पण, तंत्रज्ञानाच्या वापराने व्यवसाय वृद्धी होते? करूयात तंत्रज्ञानाची काळजी किंवा भीती कमी.

* **तंत्रज्ञानाचा खर्च:** काही संस्थांना वाटते की तंत्रज्ञान स्वीकारण्याचा खर्च हा आपल्या संस्थेच्या व्यवहारापेक्षा जास्त प्रमाणात होईल. पण, दीर्घकालीन दृष्टिकोणातून पाहता, तंत्रज्ञान स्वीकारण्याचा खर्च फायद्यापेक्षा खूपच कमी असतो.
* **तंत्रज्ञानाचा वापर कठीण आहे:** काही संस्थांना वाटते की तंत्रज्ञानाचा वापर कठीण आहे. पण, लॅपटॉप, टॅब आणि मोबाईल या आधुनिक उपकरणांचा वापर नवीन युगात संयुक्तिक ठरतो. आधुनिक साधने आणि तंत्रज्ञान वापरण्यास सोपे बनले आहे. तंत्रज्ञान स्वीकारण्यासाठी संस्थांना प्रशिक्षण देखील उपलब्ध आहे. महत्त्वाचे म्हणजे, संस्थांना, प्रशिक्षित आणि तरुण कर्मचारी खेचून घेण्यासाठी तंत्रज्ञान वापरणारी संस्था अग्रेसर ठरू शकते.
* **सदस्यांची मागणी आणि प्रतिक्रिया अतिशय महत्त्वाची आहे:** काही संस्थांना वाटते की सदस्यांना तंत्रज्ञान स्वीकारणे कठीण जाईल. पण, तंत्रज्ञान स्वीकारण्याचे फायदे सदस्यांना देखील समजतात. कधी घरबसल्या कर्जाची मागणी करता येणे हे वयस्कर सभासदांसाठी महत्वाचे आहे. तंत्रज्ञान वापर करणाऱ्या जबाबदार संस्था सभासदांना टिकवून विश्वासू संस्था बनतात. आणि ही बाब नवीन सभासद आणण्यास जरूर कारणीभूत ठरते.
* **तंत्रज्ञान न स्वीकारण्याचे इतर अनेक अडथळेदेखील असतात हेही लक्षात घ्यायला हवे.** जर संस्थांना तंत्रज्ञान स्वीकारणे शक्य झाले नाही तर, बहुराज्यीय व्यवहार, डिजिटल कॉमर्स आणि पेमेंट ॲप्स यासारखे नवीन व्यवसाय वाढविण्याचा संधींचा लाभ घेणे कठीण होईल. यामुळे संस्थांना व्यवसाय वाढ, सभासद टिकवणे, आंतरराज्य व्यवहार वाढण्यात अडथळे येऊ शकतात. पण तंत्रज्ञानाचा अभाव दुसऱ्या बाजूने फक्त समस्यांनी ग्रस्त संस्था व नागरिक कर्ज संस्थांचा लाभ घेण्याचा विचार करतील. संस्थांना या गोष्टीकडे प्राधान्याने बघितले पाहिजे की त्यांना वाढत्या कर्ज व्यवसाय क्षेत्रात स्वतःचे कसे स्थान बनवणे अपेक्षित आहे.

– जर नवीन पिढीला कर्ज संस्थांना प्राधान्य देणारा सेवा प्रदात्या संस्था म्हणून पाहणे प्रेरित असेल तर, संस्थांना तंत्रज्ञान स्वीकारणे अनिवार्य आहे. तंत्रज्ञान स्वीकारण्यामुळे संस्था आधुनिक बनू शकतात आणि नवीन पिढीला आकर्षित करू शकतात. प्रगतशील महाराष्ट्राच्या वाढत्या व्यवसायिकतेत सहकारी कर्ज संस्थांना एक अनोखे स्थान तंत्रज्ञानामुळे मिळू शकते.

अशा प्रकारे, तंत्रज्ञान आधारित कर्ज मूल्यांकन हा आपल्या सहकारी कर्ज संस्थेला डिजिटल युगात उंचावण्यासाठी एक प्रभावी साधन आहे. याचा वापर करून, आपल्या संस्थेला आपली प्रतिष्ठा वाढवता येईल, सदस्यांना अधिक विश्वास वाटेल आणि आर्थिक समावेश वाढवता येईल.

तेव्हा माहिती युगात प्रवेश अनिवार्य आहे, त्यासाठी आपला सहकारी मानस टिकवून आपण नव्या युगात जबाबदार आर्थिक संस्था म्हणून आपले १०० वर्षांचे स्थान पुढील अनेक शतकांसाठी बळकट करणे हे आपल्याच हातात आहे.

संयुक्त राष्ट्राच्या आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष २०२५ साठी आपणा सर्वांना अनेक शुभेच्छा!

**– साभार, अजित अभयकुमार भाले**
संस्थापक, मेट्टारेव सिस्टीमस, पुणे
Mettarev Systems ajit.bhalemettarev.com
मो. नं. – ९१८००७७५५४५५ *****

# देशातील सहकारी संस्थासाठी सहकार विद्यापीठ स्थापन होणार

**नवी दिल्ली –** देशातील सहकारी संस्थांसाठी नजीकच्या काळात सहकार विद्यापीठ गुजरात राज्यात स्थापन करण्यात येणार असून या माध्यमातून सहकारी संस्थासाठी कौशल्ययुक्त मनुष्यबळ होऊ शकणार आहे. याबाबतचे विधयेक लोकसभेत सादर करण्यात आले आहे.

गुजरातमधील आणंद येथील ग्रामीण व्यवस्थापन संस्थेची त्रिभुवन सहकारी विद्यापीठ म्हणून स्थापना करण्याची आणि तिला राष्ट्रीय महत्त्वाची संस्था घोषित करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

या विधेयकात विविध बाबींचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये सहकार क्षेत्रातील सध्याची शिक्षण आणि प्रशिक्षण पायाभूत सुविधा ही सहकारी संस्थामधील कर्मचाऱ्यांच्या मनुष्यबळाची व क्षमता बांधणीची सध्याची आणि भविष्यातील मागणी पूर्ण करण्यासाठी अपुरी आणि खंडित स्वरूपाची आहे. संस्थांमध्ये व्यवस्थापकीय क्षेत्रातील विविध श्रेणीतील नोकऱ्यांसाठी व्यावसायिकदृष्ट्या पात्र मनुष्यबळाचा स्थिर आणि पुरेसा दर्जेदार पुरवठा निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन करणे आवश्यक आहे.

हे प्रस्तावित विद्यापीठ शिक्षण आणि प्रशिक्षण तसेच संशोधनासाठी एकात्मिक आणि व्यापक संरचना स्थापन करून सहकार क्षेत्रातील कर्मचारी आणि मंडल सदस्यांच्या क्षमता बांधणीच्या दीर्घकाळ प्रलंबित समस्येवर अखिल भारतीय आणि केंद्रीत पद्धतीने लक्ष द्यावे लागणार आहे.

# लोकमान्य सोसायटीच्या वतीने बचत गटाच्या महिलांना कर्ज उपलब्ध

**पुणे –** लोकमान्य सोसायटीच्या वतीने बचत गटाच्या महिलांना मायक्रो लँडिंग योजनेतर्गत कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे. सहकार क्षेत्रात बहुउद्देशीय सेवेसह विश्वास आणि पारदर्शक व्यवहाराच्या माध्यमातून ग्राहक व सभासदांच्या पसंतीस उतरलेल्या लोकमान्य को–ऑप. सोसायटीच्या वारजे शाखेच्या वतीने कर्जाची उपलब्धता करण्यात आली आहे. एकूण ९ बचत गटांच्या ४५ हून अधिक महिलांना सोसायटीच्या पुणे विभागाचे प्रमुख सुशील जाधव यांच्या हस्ते १४ लाखांपेक्षा अधिक रकमेचे धनादेश देण्यात आले आहे.

# जनसेवा सहकारी बँकेचे माजी संचालक शंकर केशव पोतदार यांचे निधन



**पुणे –** जनसेवा सहकारी बँकेचे माजी संचालक शंकर केशव तथा बापू पोतदार (वय ८१) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी व मुले, सुना असा परिवार आहे.

बापूज सर्व्हिसेस या नावाने पाण्याच्या टाक्या स्वच्छ करण्याच्या व्यवसायाची त्यांनी सुमारे ४० वर्षांपूर्वी पुण्यात सुरुवात केली. स्वच्छ आणि निर्जंतुक पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या सामाजिक जाणीवेतून त्यांनी हा व्यवसाय सुरू केला. स्वच्छ अभियान उपक्रमांत त्यांनी अनेक संस्थांची कामे केली आहेत. सुमारे ५ हजार पेक्षा अधिक हौसिंग सोसायट्यांना त्यांनी सेवा दिली आहे. राष्ट्रीय सिख संगत, नगर मित्र मंडळ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अशा सर्व सामाजिक संस्थांमध्ये ते अखेरपर्यंत सक्रीय होते. जनसेवा सहकारी बँकेचे ते माजी संचालक होते.

# सहकार भारतीच्या कार्याचा विस्तार आवश्यक

**चंद्रपूर –** सहकार भारतीच्या कार्याचा विस्तार करण्याबरोबर आपल्या कामाचा दबदबा कायम ठेवणे आवश्यक आहे, असे मत सहकार भारतीचे प्रदेश महामंत्री विवेक जुगादे यांनी कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना सांगितले.

जिल्हा सहकार भारती, भाग्यश्री नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते. सहकार भारती प्रदेश उपाध्यक्षा नीलिमा बावणे, सचिव विनोद भीमनवार, पतसंस्था प्रकोष्ट प्रमुख अनिल मेंढे, नागपूर विभाग प्रमुख संजय रीकडे, सहप्रमुख विजय गोरे आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी जिल्हा अध्यक्ष म्हणून सतीश वासमवार आणि महामंत्री पदी पुष्पा गोटे यांची निवड करण्यात आली. नूतन अध्यक्ष वासमवार यांनी जिल्हा कार्यकारिणीची घोषणा केली.

प्रास्ताविक विजय गोटे यांनी आतिष कानापूरवार यांनी सूत्रसंचालन आणि पुष्पा गोटे यांनी आभार मानले.

# सरस्वती महिला पतसंस्था आयोजित रक्तदान शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद



**पुणे –** सरस्वती महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने तिळगूळ समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या सभासद महिलांसाठी वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करत असते. यावर्षी श्री. प्रतीक कदम यांचा 'खेळ पैठणीचा' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रतीक कदम यांच्या निवेदनाने आणि सादरीकरणाने कार्यक्रमात रंगत आली. प्रथम क्रमांक विजेत्या भारती खैरनार यांना पैठणी, द्वितीय विजेत्या सीमा जाधव यांना सोन्याची नथ, तृतीय विजेतीस चांदीची जोडवी आणि १० उपविजेत्यांना साड्या बक्षीस देण्यात आल्या.

*** रक्तदान शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद –**

तसेच सहकारी पतसंस्था व जनकल्याण रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन प्रथम रक्तदाते सुनील म्होकर व मुग्धा बापट, वैद्यकीय अधिकारी रमेश गायकवाड, संस्थेचे ठेवीदार रमेश परांजपे, विनायक गूपचूप, अध्यक्षा सुचित्रा दिवाण, उपाध्यक्षा वृषाली सुलाखे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. ६० रक्तपिशव्यांचे संकलन झाले. रक्तदात्यांमधे महिलांचा सहभाग लक्षणीय होता.

पतसंस्थेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांच्या आयोजनावर सातत्याने भर देण्यात येतो आणि त्याला खातेदार आणि नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो.



# अपना सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी दत्ताराम चाळके, उपाध्यक्षपदी विकास फाटक

**मुंबई** – मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक अपना सहकारी बँकेची पंचवार्षिक निवडणूक नुकतीच पार पडली. अध्यक्ष व उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीत सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष दत्ताराम चाळके हे अध्यक्षपदी तर उपाध्यक्षपदी विकास फाटक बिनविरोध निवडून आले.

सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, प्रदेश संघटन प्रमुख शरद जाधव, सहसंघटन प्रमुख विजय देशमुख, प्रवीण बुलाख, टीजेएसबी बँकेचे अध्यक्ष व बँक प्रकोष्ठ प्रमुख शरद गांगल, प्रदेश सचिव भुषण पैठणकर, सहकार भारती मुंबईचे अध्यक्ष राहुल पाटील, महामंत्री मंगेश पवार, संघटन प्रमुख संतोष सुर्वे, सहसंघटन प्रमुख जगदीश लाडवंजारी यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष चाळके यांचा सत्कार केला व वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सहकार भारतीच्या नुकत्याच झालेल्या प्रदेश अधिवेशनात चाळके यांची प्रदेश अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

# टीजेएसबी सहकारी बँक अध्यक्षपदी शरद गांगल, उपाध्यक्षपदी वैभव सिंघवी



अध्यक्ष
शरद गांगल



उपाध्यक्ष
वैभव सिंघवी

**ठाणे** – टीजेएसबी सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी शरद गांगल तर उपाध्यक्षपदी वैभव सिंघवी यांची निवड करण्यात आली आहे. गांगल यांची या पदावर दुसऱ्या वेळेस निवड करण्यात आली आहे. बँकेच्या संचालक मंडळाची बैठक नुकतीच झाली. त्यामध्ये वरील निर्णय घेण्यात आला. पुढील पांच वर्षासाठी नवीन संचालक मंडळाची निवड करण्यात आली आहे. बँकेच्या महाराष्ट्र, गोवा, गुजरात, कर्नाटक आणि मध्य प्रदेश या राज्यात एकूण १४३ शाखा कार्यरत आहेत. बँकेचा एकूण व्यवसाय २२ हजार कोटी पेक्षा अधिक आहे. तसेच बँकेच्या वतीने अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित सर्व प्रकारच्या सेवा ग्राहकांना देण्यात येत आहेत. बैठकीला मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी काम पाहिले.

# सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश मराठे यांचा अमृत महोत्सव समारंभ मुंबईत दि. १९ रोजी होणार



**मुंबई** – सहकार भारतीचे संस्थापक सदस्य तसेच माजी राष्ट्रीय अध्यक्ष आणि रिजर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक सतीश मराठे यांचा अमृत महोत्सव समारंभ येत्या दि. १९ रोजी मुंबईत आयोजित करण्यात आला आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरकार्यवाह भैय्याजी जोशी तसेच दिल्ली येथील इफकोचे प्रबंध निदेशक उदयशंकर अवस्थी आणि माजी केंद्रीय मंत्री व महोत्सव समितीचे स्वागताध्यक्ष सुरेश प्रभू तसेच सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी आणि महामंत्री दीपककुमार हे या प्रसंगी उपस्थित राहणार आहेत.

दादर येथील श्री स्वामीनारायण मंदिरातील सभागृहात सहकार भारतीच्या वतीने हा अमृत महोत्सव समारंभ सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे.

# सरस्वती पतसंस्थेच्या अध्यक्षा सुचित्रा दिवाण राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्काराने सन्मानित



**पुणे** – सरस्वती महिला नागरी सह. पतसंस्थेच्या अध्यक्षा सुचित्रा दिवाण यांना त्यांच्या सामाजिक व पर्यावरणपूरक छतशेती क्षेत्रात केलेल्या विशेष उल्लेखनीय कार्याच्या गौरवार्थ दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्थेतर्फे ‘राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार’ प्रदान करण्यात आला.

स्वयंपाकघरातील ओला कचरा व पालापाचोळा यामुळे उद्भणाऱ्या महानगरातील कचरा समस्येवर त्याच कचऱ्याचा वापर करून सेंद्रिय छत शेतीमधे अनेक प्रकारची फळे, फुले, भाज्या घेण्याचा यशस्वी प्रयोग सुचित्रा दिवाण यांनी केला आहे.

# सहकारी बँकांनी स्पर्धात्मक काळात काम करताना बदलांची नोद घ्यावी – सहकार मंत्री

**पुणे** – सहकारी बँकांनी सध्याच्या स्पर्धात्मक काळात काम करताना नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून सहकार कायद्यात होत असणाऱ्या बदलांची नोंद घ्यावी आणि कामकाजात आवश्यक ते बदल करावेत, अशी अपेक्षा राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केली आहे. पुणे जिल्हा सहकारी बँकेच्या कार्यालयास सहकार मंत्री पाटील यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांच्या समवेत पणन मंत्री जयकुमार रावल होते.

बँक अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे आणि उपाध्यक्ष सुनील चांदेरे यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी पदाधिकाऱ्यांनी सहकार मंत्री पाटील यांना बँकेच्या विविध योजनांची माहिती सांगितली. जिल्हा बँकेच्या कामकाजाबाबतसहकार मंत्री पाटील यांनी आनंद व्यक्त केला. तसेच संचालक, अधिकारी, कर्मचारी यांच्या योगदानाचे कौतुक केले.

# समस्यांचे निराकरण करून सहकार क्षेत्र बळकट करू - सहकार राज्यमंत्री डॉ. भोयर

**नागपूर –** महाराष्ट्राचे सहकार क्षेत्र बळकट करायचे आहे. या क्षेत्रात उत्तुंग भरारी घेण्याची वेळ आली आहे. अनेक समस्या देखील आहेत. या समस्यांचे निराकरण करून सहकार भारतीच्या सहकार्याने सहकार क्षेत्र बळकट करू असे सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले.




सहकार भारती नागपूर महानगर व जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यकर्ता संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. सहकार भारतीचे प्रदेश महामंत्री विवेक जुगादे, प्रदेश उपाध्यक्ष नीलिमा बावणे, महानगराचे अध्यक्ष घनश्याम कुकरेजा, जिल्हा ग्रामीणचे अध्यक्ष नंदू कन्हेर व्यासपीठावर उपस्थित होते.

राज्यमंत्री भोयर यांनी सहकाराच्या विविध बाबींवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, देशामध्ये सहकार क्षेत्रात महाराष्ट्राचे स्थान अव्वल आहे. त्यामुळे हे क्षेत्र 'सुजलांसुफलां' करण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांची आहे. या कार्यासाठी शासन सोबत आहे. ज्या ज्या आवश्यक गोष्टी आहेत, त्या करून घेण्याची क्षमता शासनामध्ये आहे. हे सर्व साध्य करताना सहकार भारतीचे मार्गदर्शन लागेल. या क्षेत्रात सहकार भारती सांगेल तेच होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविकात महामंत्री जुगादे यांनी राज्यमंत्री भोयर यांच्या कार्याचा गौरव केला. बऱ्याच वर्षांनंतर विदर्भाला सहकार मंत्रीपद मिळाले. विदर्भाला सहकाराची उज्वल परंपरा आहे. मात्र अलीकडच्या काळात सहकार क्षेत्रात विदर्भाला हवी तशी चालना मिळू शकली नाही. भोयर यांच्या नेतृत्वात या क्षेत्राला नवी दिशा व ओळख मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. महाराष्ट्रामध्ये सहकार भारतीचे कार्य जोमाने सुरू आहे. सहकार भारती व शासन यांच्या समन्वयातून सहकार क्षेत्राला नवसंजीवनी देऊ शकतो. यासाठी सहकार भारती सदैव खंबीरपणे उभी राहील असे आश्वासन दिले.

महानगराचे संघटन प्रमुख राहुल कोडमलवार यांनी सूत्रसंचालन केले. सहकार भारतीचे पदाधिकारी विनोद भिमनवार, नाना महल्ले, अंजली मुळे, विभाग प्रमुख संजय कुमार रोकडे, जिल्हा महामंत्री चंद्रशेखर लांडे, शहर महामंत्री किरण रोकडे, जिल्हा संघटन प्रमुख विनय राजे, झामेश्वर काकडे, शहर संघटन प्रमुख विश्वनाथ कुंभलकर, महिला प्रमुख संगीता ठाकरे, कविता खापरे, पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष राजेंद्र घाटे उपस्थित होते.

# चंद्रपूर अर्बनला बँको पुरस्कार



**चंद्रपूर –** आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सहकार क्षेत्रात आदर्शवत काम करणाऱ्या चंद्रपूर अर्बन मल्टिस्टेटला आठव्यांदा बँको पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. माजी सहकार आयुक्त चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते संस्थेच्या उपसरव्यवस्थापक वंदना नखाते-ठक्कर यांनी पुरस्कार स्विकारला. चंद्रपूर अर्बनने एका दशकात आधुनिक तंत्रज्ञानावर अधिकाधिक भर दिला आहे. याची दखल घेऊन कोल्हापूरच्या अवि'ज पब्लिकेशन आणि पुण्याच्या गॅलेक्सी इन्मा यांनी संयुक्तपणाने हा पुरस्कार प्रदान केला. यावेळी शाखेचे व्यवस्थापक गजानन जाधव, वणी शाखेचे व्यवस्थापक महेश वऱ्हाटे उपस्थित होते.

# गोंदिया जिल्हा सहकार भारती अध्यक्षपदी भैरोसिंह नागपुरे

**गोंदिया –** गोंदिया जिल्हा सहकार भारतीची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. अध्यक्षपदी भैरोसिंह नागपुरे तर उपाध्यक्षपदी तेजराम चौहान आणि महामंत्री म्हणून जगदीशप्रसाद अग्रवाल यांची निवड करण्यात आली आहे. अन्य पदाधिकारी पुढीलप्रमाणे – खजिनदारपदी सीए दिनेशकुमार दादरीवाल, संघटनमंत्रीपदी वजीर बिसेन, सहसंघटनमंत्री भरत हरिणखेडे, प्रकोष्ट प्रमुख काशीराम हुकरे, महिला प्रकोष्टपदी शिला तिवारी यांची निवड करण्यात आली.

# सहकारी क्षेत्रातील पतसंस्थांना राजमान्यता मिळणे आवश्यक

**हिंगणघाट –** सहकारी क्षेत्रातील पतसंस्थाना लोकमान्यता मिळाली, पण राजमान्यता मिळणे आवश्यक आहे, असे मत सहकार भारतीचे राष्ट्रीय प्रकोष्ट प्रमुख आणि बुलढाणा अर्बन को-ऑप. सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष देशपांडे यांनी व्यक्त केले. वर्धा जिल्हा सहकार भारती आणि पतसंस्था संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पतसंस्था संचालक आणि कर्मचारी प्रशिक्षण वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



ते म्हणाले, राज्याच्या विविध भागात अनेक सहकारी पतसंस्था चांगले काम करीत आहेत. सध्या २२ हजारपेक्षा अधिक पतसंस्था कार्यरत आहेत. सामान्य जनतेचा विश्वास या संस्थांवर आहे. चांगले काम करणाऱ्या पतसंस्थांना शासनाच्या विविध योजनांमध्ये सहभागी करून घेण्यात यावे. त्यामुळे विविध योजना समाजातल्या अखेरच्या घटकापर्यंत पोहोचू शकतील.

सहकार आणि वस्त्रोद्योग विभागाचे सहसचिव संतोष पाटील आणि सहकार भारतीचे प्रदेश महामंत्री विवेक जुगादे यांनी मार्गदर्शन केले. व्यवस्थापन आणि ताळेबंद यावर अशोक नाईक तर पतसंस्थांची वसूली यावर महेश जाधव यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा निबंधक सीमा पांडे, जिल्हा सहकारी बँक राजेंद्र कोसडीकर, सहकार भारती प्रदेश सचिव विनोद भीमनवार, वर्धा नागरी सहकारी बँक उपाध्यक्ष मंगेश परसोडकर, जिल्हा पतसंस्था अध्यक्ष सुधाकर घवघवे, जिल्हा सहकार भारती अध्यक्ष प्रभाकर कोळसे उपस्थित होते. प्र. लीना शेंडे यांनी संचालन आणि महामंत्री शामकुमार खत्री यांनी आभार मानले.

# सहकार भारतीच्या विचाराने सहकाराची दिशा ठरवू - सहकार राज्यमंत्री डॉ. भोयर



**मुंबई** – सहकार भारतीला सोबत घेऊनच राज्यातील सहकाराची पुढील दिशा ठरवली जाईल असे सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले. सहकार भारती वतीने आयोजित आंतरराष्ट्रीय सहकार दिन आणि सहकार भारती स्थापना दिवस निमित्ताने संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी ते बोलत होते.

संवाद मेळाव्यास सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, सहकार भारती प्रदेश अध्यक्ष दत्ताराम चाळके प्रदेश महामंत्री विवेक जुगादे उपस्थित होते. हाऊसिंग फेडरेशन, पतसंस्था फेडरेशन, सेवा संस्था फेडरेशन, मजूर संस्था फेडरेशन, बँक फेडरेशन, फिशरीज फेडरेशन आणि विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

मुंबई अध्यक्ष राहुल पाटील यांनी प्रास्ताविक केले. महामंत्री जुगादे यांनी सहकार भारतीचे महाराष्ट्रातील योगदान आणि शासनाकडून असलेल्या अपेक्षा याची मांडणी केली. प्रदेश अध्यक्ष चाळके यांनी मनोगतव्यक्त केले. ऑडिटर प्रकोष्ठ प्रमुख विजय शेलार यांनी आभार मानले.

प्रदेश संघटन प्रमुख शरद जाधव, सहसंघटन प्रमुख प्रवीण बुलाख, बचत गट प्रकोष्ठ प्रमुख श्रीमती जया अलीमचंदानी, महिला सहकारी संस्था प्रमुख भारती पवार, हाउसिंग प्रकोष्ठ प्रमुख अश्विनी बुलाख, मत्स्य प्रकोष्ठ सहप्रमुख शैलेश दरगुडे उपस्थित होते. मेळाव्याच्या निमित्ताने मुंबई विभागीय सहनिबंधक शहाजी पाटील, जिल्हा उपनिबंधक नितीन काळे, सहकार भारती बँक प्रकोष्ठ प्रमुख शरद गांगल, मुंबई हाउसिंग फेडरेशनचे अध्यक्ष प्रकाश दरेकर बृहन्मुंबई पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष शिवाजी नलावडे, महाराष्ट्र वेल्फेअर सोसायटीज असोसिएशनचे अध्यक्ष सीए रमेश प्रभू, पश्चिम उपनगर पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष लक्ष्मण पाटील, मुंबई कांग्रेस सहकार सेलचे अध्यक्ष यशवंत उर्फ भाई सावंत, ज्ञानदीप पतसंस्थेचे अध्यक्ष जिजाबा पवार, मुंबई जनकल्याण बँकेचे अध्यक्ष संतोष केळकर, प्रदेश सचिव भुषण पैठणकर, मुंबई अध्यक्ष राहुल पाटील, महामंत्री मंगेश पवार, संघटन प्रमुख संतोष सुर्वे, सहसंघटन प्रमुख जगदीश लाडवंजारी, कोकण विभाग सहप्रमुख विणा मोकाशी, कृष्णकांत निमसे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## सहकार क्षेत्राला झळाळी देण्यासाठी सहकार भारती प्रयत्नशील - जिल्हाध्यक्ष जाधव

**रायगड** – सहकार क्षेत्रात सकारात्मक सुसंस्कृत प्रवाह आणण्यासाठी तसेच नवी झळाळी देण्यासाठी सहकार भारती सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सहकार भारती रायगड जिल्हा अध्यक्ष मेघराज जाधव यांनी सांगितले. मुरुड येथील वसंतराव नाईक महाविद्यालयात सहकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. सहकार तत्त्वे, सहकार भारतीची कार्यप्रणाली व संघटनात्मक कार्याची माहिती त्यांनी सांगितली. ते म्हणाले, सध्याच्या स्थितीत २८ राज्यांमध्ये ६०० जिल्ह्यांमध्ये बँका पतसंस्था, सहकारी संस्था प्राथमिक शेती संस्था बचतगट माहिती तंत्रज्ञान, मत्स्य साखर उद्योग गृहनिर्माण आदी विविध प्रकोष्ठांमध्ये काम सुरू आहे.

वसंतराव नाईक महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. जे. के कांबळे, मानद सचिव डॉ. इस्माइल घोले, माजी प्राचार्य डॉ. विश्वास चव्हाण, डॉ. मुनेश्वर, डॉ. मुरलीधर गायकवाड, डॉ. सुभाष म्हात्रे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. बहिरगुंडे उपस्थित होते.

प्रास्ताविकात डॉ. कांबळे यांनी सहकार भारतीचे कार्य अत्यंत समर्पित भावनेने सुरू असून सहकार क्षेत्राला दिशा दिग्दर्शन देण्याचे कार्य अविरतपणे गेल्या ४२ वर्षांपासून सुरू असल्याबद्दल अभिनंदन केले. जय श्रीराम नागरी पतसंस्थेचे सरव्यवस्थापक संजय ठाकूर यांनी आर्थिक क्षेत्रात पतसंस्थांचे योगदान या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. मुनेश्वर यांनी आभार मानले.

## एनकेजीएसबी को-ऑपरेटिव्ह बँकेची रत्नागिरी शाखा नवीन जागेत स्थलांतरित

**रत्नागिरी** – एकशे सात वर्षांहून अधिक वर्षांचा वारसा असलेल्या एनकेजीएसबी को-ऑपरेटिव्ह बँकेने रत्नागिरी शाखा येथे नवीन जागेत स्थलांतरित केली आहे. नवीन जागेचे उद्घाटन बँकेचे संचालक शशांक गुळगुळे यांच्या हस्ते करण्यात आले. गुळगुळे यांच्यासोबत डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर सीए प्रणाली धराधर, जनरल मॅनेजर संतोष बोरकर, असिस्टंट जनरल मॅनेजर किशोर जाधव आणि मृणाल मुणगेकर, बँकेचे ग्राहक उपस्थित होते.

## सहकार मंत्रालयाच्या स्थापनेमुळे सहकार क्षेत्राला नवसंजीवनी - फुंडकर

**अकोला**– राष्ट्रीय स्तरावरील सहकार मंत्रालयाच्या स्थापनेमुळे सहकार क्षेत्राला नवसंजीवनी मिळाली आहे, असे मत सहकार भारतीचे जिल्हाध्यक्ष रामेश्वर फुंडकर यांनी व्यक्त केले आहे. सहकार भारती स्थापना दिनाच्या कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. जिल्ह्याच्या विविध भागात सहकार भारतीचे काम वाढविण्यावर कार्यकर्ते पदाधिकारी यांनी भर द्यावा असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात भारत माता पूजनाने झाली. यावेळी रामेश्वर खोंड म्हणाले की, सहकाराच्या क्षेत्रात संस्कारित कार्यकर्ते घडविण्याचे व्रत सहकार भारतीने स्वीकारले आहे आणि ते पूर्ण करण्यात येणार आहे. सहकार भारती प्रदेशच्या विविध समित्यांवर निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. महामंत्री जयनेन्द्र लुंकड, तसेच दीपक मायी, जिल्हा माहिती सहप्रमुख अश्विनी दिक्षित आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन पूजा जलतारे, तर जिल्हा संघटन मंत्री सुनील कुरेकर यांनी आभार मानले.

## टीजेएसबी बँकेला इंडियन बँक्स असोसिएशनचे चार पुरस्कार प्रदान

**ठाणे** – टीजेएसबी बँकेला इंडियन बँक्स असोसिएशनचे चार पुरस्कार नुकत्याच झालेल्या २० व्या वार्षिक बँकिंग तंत्रज्ञान परिषदेत प्रदान करण्यात आले. टीजेएसबी सहकारी बँकेच्या तंत्रज्ञानावर आधारित ग्राहक सेवेची नोंद घेऊन सन्मानित करण्यात आले आहे.

आरबीआयचे डेप्युटी गव्हर्नर टी रबी संकर, आयबीएचे अध्यक्ष एम. व्ही. राव, आयआयटी मुंबईचे प्राध्यापक दीपक पाठक यांच्या हस्ते बँकेचे उपाध्यक्ष वैभव सिंघवी यांनी पुरस्कार स्वीकारले.

# आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्ताने राज्यभरात सहकार दिंडीने उत्साह

## सहकार क्षेत्राची सकारात्मक बाजू जनतेसमोर येणे गरजेचे - सहकार आयुक्त तावरे





सहकार दिंडीत 'सहकार महर्षी' ग्रंथाला मानाचे स्थान

International Year of Cooperatives
2025
Cooperatives Build a Better World

**पुणे** – सहकार क्षेत्राची सकारात्मक बाजू जनतेसमोर येणे गरजेचे आहे आणि त्याचा प्रसार आणि प्रचार सर्वत्र होणे अपेक्षित आहे अशी अपेक्षा राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी व्यक्त केली आहे. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सहकार दिंडीच्या कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. सहकारी पतसंस्थांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सहकार आयुक्त कार्यालय सर्वतोपरी प्रयत्नशील आहे असे त्यांनी नमूद केले.

पतसंस्था महासंघाचे अध्यक्ष काका कोयटे यांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या विविध जिल्ह्यातून काढण्यात आलेल्या सहकारी दिंड्या पुण्यात दाखल झाल्या. त्यानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते. नागपुर, वर्धा, यवतमाळ बुलढाणा, मुंबई, पुणे सोलापूर, कोल्हापूर, अहिल्यानगर येथून दिंड्या येथे दाखल झाल्या येथून सर्व दिंड्या शिर्डीकडे मार्गस्थ झाल्या.

राज्याचे अतिरिक्त सहकार आयुक्त श्रीकृष्ण वाडेकर, सहकार निवडणूक प्राधिकरण आयुक्त अनिल कवडे, जिल्हा मध्यवर्ती बँक अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे, नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष मोहिते, बुलढाणा अर्बनचे मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष देशपांडे आदी पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

**शिर्डी अधिवेशनासाठी मुंबई येथून स्व. धनंजयराव गाडगीळ आणि नागपूर येथून सहकार महर्षी वैकुंठभाई मेहता सहकार दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही दिंड्या शिर्डी येथे पोहोचल्या. या दिंड्यांमध्ये सहकार भारतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच त्या त्या जिल्ह्यातील सहकारी संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. विविध जिल्ह्यांमध्ये या सहकार दिंडीचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले.**

दि. ८ आणि ९ फेब्रुवारी या कालावधीत शिर्डी येथे आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेसाठी विविध देशांतून सहकारी संस्थांचे प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. यूनोच्या वतीने सन २०२५ हे आंतराष्ट्रीय वर्ष म्हणून नुकतेच घोषित करण्यात आले असून त्या निमित्ताने ही परिषद आयोजित करण्यात आली आहे.

दि. ८ रोजी विविध देशातील सहकारी संस्था प्रतिनिधी आणि राज्यातील सहकार क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या निवडक युवक आणि महिला प्रतिनिधींची कार्यशाला होणार आहे. तर दि. ९ रोजी राज्यातील पतसंस्थांच्या प्रतिनिधींचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसयांना निमंत्रित करण्यात आले आहे. या परिषदेत सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# पुणे सहकारी बँकेवर सहकार खात्याकडून प्रशासक मंडळ नियुक्त

**पुणे** – पुणे सहकारी बँकेवर राज्याचे सहकार आयुक्त व निबंधकांनी अशासकीय पाच सदस्यांचे प्रशासक मंडळ नियुक्त केले असून यामध्ये पांडुरंग राऊत, ॲड. विकास रासकर, भालचंद्र कुलकर्णी, राहुल पारखे व नेहा केदारी यांचा समावेश आहे. सहकार खात्याच्या सहायक निबंधक प्रगती वाबळे यांची प्रशासक मंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रशासक मंडळातील सर्व सदस्य हे साखर उद्योग, बँकिंग, सहकार, शेती यामधील अनुभवी असून ते या बँकेचे जुने सभासद आणि ठेवीदार आहेत. या सभासदांच्या प्रयत्नातूनच गेल्या ४ महिन्यांत नवीन सभासदांकडून सुमारे रु. २ कोटींचे भाग भांडवल जमा केल्याने बँकेचे भाग भांडवल आता रु. ४ कोटी ६३ लाख इतके झाले असल्याने बँकेचे नक्त मूल्य (नेट वर्थ) अधिक झाले आहे. या भरीव कामगिरीमुळे ही बँक लवकरच निर्बंधमुक्त होईल व सभासदांना दैनंदिन व्यवहार लवकरच सुरळीतपणे करता येतील, असा विश्वास नवनिर्वाचित प्रशासक मंडळाने व्यक्त केला आहे. यापुढे थकित कर्ज वसुलीवर अधिक भर देणार असल्याचेही प्रशासक मंडळाच्या सदस्यांनी यावेळी सांगितले.

पुणे सहकारी बँकेची स्थापना माजी खासदार स्व. ल. सो. तथा अण्णा जोशी यांच्या नेतृत्वाखाली २००३ मध्ये झाली होती. सध्या बँकेच्या पुण्यात शुक्रवार पेठ व बाणेर अशा २ शाखा असून बँकेकडे ठेवी रु. ९ कोटी ५० लाखांच्या आहेत तर कर्जे रु. ५ कोटी ५० लाखांची आहेत. कोरोना काळापासून म्हणजे मार्च २०२० पासून बँकेच्या व्यावसायिक खातेदारांना आलेल्या अडचणींमुळे या बँकेची वाढत गेलेली थकित कर्जे (एनपीए) आणि संचित तोटा यामुळे रिझर्व्ह बँकेने मार्च २३ पासून पुणे सहकारी बँकेवर आर्थिक निर्बंध लावले आहेत. सध्या बँकेच्या खातेदारांना फक्त रु. १० हजार काढता येत आहेत.

# ऊसाच्या शेतीसाठी 'एआय'चा वापर भविष्यात उपयुक्त ठरेल



**पुणे** – ऊसाच्या शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानांचा एआय वापर होत असून यामुळे ऊसाचे उत्पन्न वाढविता येणे शक्य आहे. हे लक्षात घेऊन वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या वतीने यासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करणार आहे. यासाठी आवश्यक असणारे संशोधन सुरू असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी सांगितली.

वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. या कार्यक्रमात विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले. उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, संस्थेचे उपाध्यक्ष आणि माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, जयंत पाटील, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, बाळासाहेब पाटील तसेच संस्थेचे महासंचालक संभाजी कडू पाटील, सल्लागार शिवाजीराव देशमुख आदी व्यासपीठावर होते.

बदलते हवामान पावसाचा लहरीपणा आणि पाण्याची उपलब्धता लक्षात घेता पुढील काळात साखर कारखान्यांना ठराविक वेळेतच उसाचे गाळप करण्याची वेळ येईल असे नमूद करून ते म्हणाले, म्हणून ऊसाच्या क्षेत्रात वाढ करणे आणि उत्पादकता वाढविणे यावर अधिक भर द्यावा लागणार आहे. याचा गांभीर्याने विचार करावा लागणार आहे संस्थेच्या वतीने काही जिल्ह्यात संशोधन केंद्र सुरू केली आहेत. या माध्यमातून उस उत्पादक शेतकऱ्यांना माहितीची सुविधा उपलब्ध होणार आहे.

संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या पुरस्काराच्या रोख रकमेत वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार दहा हजारची रक्कम वाढवून ती एक लाख रुपये करण्यात आली आहे असे नमूद करून ते म्हणाले, केंद्र सरकारने पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण प्रमाण २० टक्के करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. आजवर राज्यातून ८५ कोटी लिटर पुरवठा करण्यात आला आहे. यामुळे साखर कारखान्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होणार आहे, असे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, गेल्या काही वर्षात एफआरपीच्या रकमेत वाढ होत गेली. मात्र एमएसपीच्या रकमेत वाढ झाली नाही. ती वाढणे गरजेचे आहे. सध्याचा दर ३६०० – ३८०० रुपये असून ती वाढायला हवी. अंदाजे एप्रिल ते ऑगस्ट दरम्यान साखरेचे दर वाढणे शक्य आहे. याबाबत केंद्रीय सहकार मंत्री शहा यांच्या सोबत चर्चा झाली आहे. तसेच खांडसरीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे. त्यामध्ये अनियमितता दिसत असल्याने त्यावर बंधने आणण्याचा विचार सुरू आहे. कारखान्यांच्या तुलनेत उसाचे क्षेत्र कमी आहे असे नमूद करून ते म्हणाले, याबरोबर यांत्रिक उस तोडणीवर अधिक भर देण्याची गरज आहे. साखर कारखानदारी आणि शासन यांच्यामध्ये समन्वय असण्याची गरज आहे.

सहकार मंत्री पाटील यांनी सांगितले की, सहवीज निर्मितीसाठी शासनाने अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे तोटा दूर होण्यास मदत होणार आहे. तसेच उस तोडणीसाठी यंत्राला अनुदान देण्यात येत आहे. आजवर ९०० यंत्रांना मान्यता देण्यात आली आहे. उपाध्यक्ष वळसे पाटील यांनी प्रास्ताविक केले. महासंचालक कडू पाटील यांनी विषय पत्रिकेवरील ठराव मांडले. ते सभेत मंजूर करण्यात आले.

# विस्माच्या विविध मागण्यांचा गांभीर्याने विचार करणार – सहकार मंत्री बाबासाहेब पाटील



**पुणे** – महाराष्ट्राची सहकार चळवळ संपूर्ण देशाला प्रेरणादायी असून या चळवळीला भविष्यात ऊर्जितावस्था आणण्यासाठी मुख्यत्वे प्रयत्न करण्यात येतील, असे सुतोवाच राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले आहे. वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन सहकार मंत्री पाटील यांना देण्यात आले. सर्व मागण्यांचा सकारात्मक विचार करण्यात येईल, असे आश्वासन पाटील यांनी दिले.

विस्माचे महासंचालक डॉ. पांडुरंग राऊत, लोकमंगल साखर उद्योगाचे सतीश देशमुख, साखर आयुक्त डॉ. कुणाल खेमनार, विस्माचे व्यवस्थापकीय संचालक अजित चौगुले यांच्या वतीने निवेदन देण्यात आले. त्यावेळी सहकार मंत्री पाटील बोलत होते. सहकार चळवळीचे उद्दिष्ट गाठताना विकास सोसायट्या, साखर उद्योग, सहकारी बँक अशा विविध घटकांचे प्रश्न सोडविण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे.

राज्याच्या बहुतांशी भागात एक हजार टन ते अडीच हजार टन क्षमतेचे गूळ – खांडसरी कारखाने येत आहेत. साखर कारखान्याप्रमाणे गूळ खांडसरी उद्योगांना उस गाळप परवाना, शुगर केन कंट्रोल ऑर्डर त्याचप्रमाणे उस उत्पादक शेतकऱ्यांना ऊसाची रास्त किंमत आणि किफायतशीर किंमत एफआरपी देण्याचे बंधन लागू करण्यात यावे, अशी मागणी महासंचालक डॉ. राऊत यांनी केली. तर व्यवस्थापकीय संचालक चौगुले यांनी सांगितले की, साखरेचा किमान विक्री दर हा ३१ रुपये ऐवजी उत्पादन खर्चानुसार ४१ रुपये करण्यात यावा. तसेच इंधनामध्ये इथेनॉलचे मिश्रण २० टक्के करण्यात यावे, यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकारला शिफारस करावी, अशी मागणी करण्यात आली.

# सहकारी संस्था चालवताना सुशासन गरजेचे - सुधीर पंडित



**पुणे** – सहकारी संस्था चालवीत असताना सुशासन असणे गरजेचे आहे तरच संस्थेची प्रगती होत असते, असे मत सहकार क्षेत्राचे अभ्यासक सुधीर पंडित यांनी व्यक्त केले आहे. सहकार भारतीच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सहकार भारतीच्या माजी प्रदेशाध्यक्ष स्व. शशिताई अहिरे यांना आदरांजली वाहण्यात आली. कार्यक्रमास पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन अध्यक्ष सुभाष मोहिते, सहकार भारती प्रदेश सहकोषाध्यक्ष औदुंबर नाईक, गृहनिर्माण प्रकोष्ट प्रमुख देवदत्त बोराळकर, साखर कारखाना प्रकोष्ट प्रमुख साहेबराव खामकर, विनायक साखरे, तसेच केंद्रीय आणि राज्य स्तरावरील पदाधिकारी उपस्थित होते.

सहकारी संस्थेला गालबोट लागणार नाही, याची काळजी संस्था व्यवस्थापनेने घेतली पाहिजे, असे नमूद करून ते म्हणाले, सहकारी संस्था स्थापन करून त्या कॉर्पोरेट पद्धतीने चालविणे आवश्यक आहे, तसेच संस्थेच्या दैनंदिन कामकाजात अधिकाधिक प्रमाणावर अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास व्यवसाय वृद्धीच्या दृष्टीने उपयुक्त ठरणार आहे, असे पंडित यांनी सांगितले.

बँक प्रकोष्ट प्रमुख अभय माटे म्हणाले की, संस्था चालविताना पदाचा अहंकाराची भावना मनामध्ये न ठेवता आहे त्या पदाकडे जबाबदारी म्हणून पाहून काम करण्याची गरज आहे कारण सध्याच्या स्पर्धेच्या काळात ग्राहकांना आणि खातेदारांना अधिकाधिक चांगली सेवा देण्यासाठी व्यापक स्तरावर प्रयत्न करण्याची गरज आहे.

पुणे विभाग प्रमुख गिरीश भवाळकर यांनी सहकार भारतीच्या पुणे महानगराची कार्यकारिणी जाहीर केली. अध्यक्ष म्हणून दिनेश गांधी, महामंत्री वसंतराव गुंड, संघटनप्रमुख नीलकंठ नगरकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## पुणे महानगर कार्यकारिणी घोषित

**पुणे** – सहकार भारती पुणे महानगर कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी सीए दिनेश गांधी तर उपाध्यक्षपदी श्रीप्रसाद रिसबुड यांची निवड करण्यात आली आहे. महामंत्रीपदी सीए वसंतराव गुंड यांची निवड करण्यात आली आहे.

*** अन्य पदाधिकारी पुढीलप्रमाणे** – उपाध्यक्ष व प्रशिक्षण – श्रीमती सूचित्रा दिवाण, संघटन प्रमुख – नीलकंठ नगरकर, सहसंघटन प्रमुख – सीए अथर्व नवसारीकर, सचिव – प्रकाश पटवर्धन, कोषाध्यक्ष – दीपक अहिरे, सहकोष प्रमुख – प्रशांत कुलकर्णी. महिला प्रमुख – वैशाली राणा, महिला सहप्रमुख – श्रुति मनोरे, पतसंस्था प्रकोष्ठ प्रमुख – वसुधा खरे, सहप्रमुख – शिवाजी कोथमिरे, बँक प्रकोष्ठ प्रमुख – सीए केतन जोगळेकर, सहप्रमुख – सीए पेंडसे, नीलेश येवलेकर, गृह निर्माण प्रकोष्ठ प्रमुख – नितिन टाकळकर, सहप्रमुख – विलास नर्हे, आयटी – मीडिया प्रकोष्ठ प्रमुख – हेरंब दामले, सहप्रमुख – धनंजय पाटील, ऑडिट प्रकोष्ट प्रमुख – प्रकाश पाठक, बचत गट प्रकोष्ठ प्रमुख – भाग्यश्री बोरकर, सहप्रमुख – सुवर्णा भेरेकर, साखर प्रकोष्ठ समन्वयक – बाळ भिंगारकर, विधी प्रकोष्ठ प्रमुख – हर्षल परब, मल्टिस्टेट पतसंस्था प्रकोष्ठ प्रमुख श्रीकृष्ण घोलप, सोशल मीडिया प्रसिद्धी – देवदत्त कसबेकर.

## डिफेन्स अकौंटस सहकारी बँकेवर लावलेले निर्बंध काढण्यात आले

**पुणे** – येथील डिफेन्स अकौंट्स सहकारी बँकेवर लावण्यात आलेले निर्बंध आरबीआयने उठविले आहेत. त्यामुळे बँकेच्या ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. सन २३ मध्ये हे निर्बंध लावण्यात आले होते. बँक गेली १२० वर्षे कार्यरत आहे.

कोरोना परिस्थिती आणि बदललेली आर्थिक व्यवस्था यामुळे बँकेला अनुत्पादित कर्जाच्या अडचणीला सामोरे जाण्याची वेळ आली. निर्बंध असूनही नव्याने समाविष्ट झालेल्या संचालकांनी बँकेच्या भाग भांडवलात लक्षणीय वाढ केली आणि आरबीआयने दिलेले उद्दिष्ट पूर्ण केले. बँकेची नेटवर्थ २१७.०१ लाख इतकी आहे. या अडचणीतून सर्व सदस्य, ठेवीदार, कर्जदारांच्या सहकार्यामुळे बँक निर्बंधातून बाहेर पडली आहे. बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी विद्या पाटील यांनी ही माहिती सांगितली.

## सोलापूर जिल्हा पतसंस्था प्रकोष्ट समिती सदस्यपदी सुनील पंडित झरेगांवकर

**सोलापूर** – विना संस्कार नही सहकार, विना सहकार नही उद्धार हे ब्रीद घेउन सहकार क्षेत्रात कार्यरत असणारी देश भरातील अग्रगण्य संस्था असून सोलापूर जिल्ह्याच्या पतसंस्था प्रकोष्ठ समितीवर सुनील पंडित झरेगांवकर यांची सदस्यपदी निवड झाली आहे. या निवडीचे पांचाळ सोनार समाज गौरव समिती तथा सोनार समाज संघटना यांनी स्वागत करून अभिनंदन केले आहे.

## आर्थिक व्यवहारात पारदर्शकता येण्यासाठी कामकाज ऑनलाईन व्हावे - गायकवाड

**सोलापूर** – सहकारी संस्थांचे संपूर्ण कामकाज ऑनलाईन पद्धतीने झाल्यास आर्थिक व्यवहारात अधिक प्रमाणात पारदर्शकता येण्यास हातभार लागणार आहे आणि संस्थांना ज्या त्या दिवशी व्यवहार ऑनलाईन अपलोड करणे बंधनकारक करण्यात येणार आहे, असे जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी सांगितले.

ते म्हणाले, केंद्रीय सहकार मंत्रालयाच्या धोरणानुसार नाबार्डच्या माध्यमातून सहकारी संस्था मजबुतीकरण करण्यासाठी निधीची उपलब्धतता करण्यात येणार आहे. तसेच सहकारी संस्थांचा सर्व कारभार ऑनलाईन करण्यात येणार आहे. यामुळे संस्थांच्या आर्थिक व्यवहारात अधिकाधिक प्रमाणात पारदर्शकता येण्यास मदत होणार आहे. त्यामुळे गैरप्रकाराला आळा बसणार आहे. संगणकीकरणाच्या प्रक्रियेमुळे सहकारी संस्थांमध्ये नेमके काय सुरू आहे, याचा संदर्भ एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे.

आगामी काळात होत असणाऱ्या सहकारी संस्थांच्या निवडणुकीसाठी सहकार विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध आहे. मात्र निवडणूक टाळण्यासाठी सहकारी संस्था मतदार यादी वेळेवर सादर करीत नाही अशा संस्थांवर प्रशासक नेमण्याची शिफारस करण्यात येणार आहे आणि वेळप्रसंगी आवश्यक ती कारवाई करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

# राजर्षी शाहू मल्टिस्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटी पुरस्काराने सन्मानित



**बुलढाणा –** राजर्षी शाहू मल्टिस्टेट को. ऑप. क्रेडिट सोसायटीने सलग दुसऱ्यांदा बँको ब्लू रिबन पुरस्कारावर मोहर उमटवली आहे. लोणावळा येथील कार्यक्रमात संस्थापक अध्यक्ष संदीप शेळके, संस्थाध्यक्षा मालतीताई शेळके यांनी माजी सहकार आयुक्त चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते हा पुरस्कार स्वीकारला.

अत्याधुनिक तंत्रज्ञान, कुशल व उच्चशिक्षित मनुष्यबळ, प्रशस्त इमारत, कामाच्या ठिकाणी असलेली प्रसन्नता यामुळे महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशात संस्थेची यशस्वी घोडदौड सुरु आहे. सहकारातील अनेक पुरस्कार संस्थेला मिळालेले आहेत. बँको ब्लू रिबन पुरस्कार सलग दुसऱ्यांदा मिळाला. पुरस्कार सोहळ्याला बँको अविज पब्लिकेशनचे मुख्य संपादक अविनाश शिंत्रे-गुंडाळे, गॅलेक्सी इनमा पुणेचे संचालक अशोक नाईक यांच्यासह बँकिंग क्षेत्रातील तज्ञ, दिग्गज, विविध संस्थांचे वरिष्ठ संचालक उपस्थित होते.

# नांदणी सहकारी बँकेला बँको ब्ल्यू रिबनचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्रदान



**कोल्हापूर –** सन २३-२४ या बँक अहवाल सालात नांदणी सहकारी बँकेने आर्थिक स्तरावर व गुणात्मक पातळीवर उत्तम प्रगती केल्याने बँकेस २७५ ते ३०० कोटी पर्यंत बँक गटातून राष्ट्रीय पातळीवर 'बँको ब्लू रीबनचा प्रथम' क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

लोणावळा येथे अवि'ज पब्लिकेशनचे अध्यक्ष अविनाश शिंत्रे व रिज़र्व बँकेचे ऑफ इंडियाचे निवृत्त चीफ जनरल मॅनेजर भारगेश्वर बैनर्जी व इतर मान्यवर यांचे हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. बँकेचे अध्यक्ष. अप्पासाहेब लठ्ठे व उपाध्यक्ष राजेंद्र खूळ यांनी पुरस्कार स्वीकारला. बँकेला हा सहावा पुरस्कार मिळालेला आहे. आतापर्यंत राज्यस्तरीय चार पुरस्कार व केंद्र स्तरावर दोन पुरस्काराने बँक सन्मानित झाली आहे.



# निवेदिता महिला सोसायटीला बँको ब्ल्यू रिबन पुरस्कार

**नवरगाव –** बँको पतसंस्था ब्लू रिबन पुरस्कार च्या १५० कोटी ठेवी असणाऱ्या महिला पतसंस्था विभागातून निवेदिता महिला सोसायटी प्रथम पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले. संकलित केलेल्या ठेवी व बँकिंग तसेच सामाजिक क्षेत्रात महिला सोसायटीने उल्लेखनीय काम केल्याबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला.

माजी सहकार आयुक्त चंद्रकांत दळवी, बँकेचे मुख्य संपादक अविनाश शिंत्रे-गुंडाळे, गॅलेक्सी इनमा पुणेचे संचालक अशोक नाईक यांच्या शुभहस्ते संस्थेच्या अध्यक्षा सौ. सुनंदाताई बाकरे व प्रशासकीय समिती सदस्य प्राचार्य डॉ. सुरेशराव बाकरे यांनी पुरस्कार स्वीकारला. या कार्यक्रमाला राज्यातील बँकांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# भाग्यश्री नागरी सहकारी पतसंस्था बँको पुरस्कार प्रदान

**नवरगाव –** राज्यातील नागरी सहकारी पतसंस्था विभागात २०० ते २५० कोटी रुपये गटात उत्कृष्ट काम करण्याऱ्या नागरी सहकारी पतसंस्थांना बँको तर्फे २०२३-२४ या वर्षाकरीता भाग्यश्री नागरी सहकारी पतसंस्थेला सन्मानित करण्यात आले. माजी सहकार आयुक्त चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते संस्थेचे अध्यक्ष किशोर महालक्ष्मी, संस्थेचे सहाय्यक व्यवस्थापक सुधीर बोरकर व शाखा व्यवस्थापक किशोर कांबळे यांनी सन्मान स्वीकारला.

दि. ३१ मार्च २०२४ च्या आर्थिक स्थितीवर संस्थेचे नेट एन.पी.ए ० टक्के आहे. भाग्यश्री पतसंस्थेच्या ७ शाखा असून, ग्राहकांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. संस्थेने स्थितीवर ३७० कोटीच्या व्यवसायाचा टप्पा पार केलेला आहे.

# दि हस्ती सहकारी बँकेला बँको ब्लू रिबन पुरस्काराने सन्मानित

**धुळे, दोंडाईचा –** येथील दि हस्ती सहकारी बँकेला बँको ब्लू रिबन पुरस्काराने लोणावळा येथील कार्यक्रमात नुकतेच गौरविण्यात आले आहे. बँकेचे व्यवस्थापन मंडळ सद्स्य हितेंद्र जैन, आनंदकुमार जैन, शहादा शाखा समिती अध्यक्ष योगेश अग्रवाल आदी यावेळी उपस्थित होते. एक हजार ते साडे बाराशे कोटी ठेवी असणाऱ्या बँक गटातून बँकेला प्रथम क्रमांक मिळाला आहे. समितीने केलेल्या मूल्यांकनाच्या आधारावर बँकेची निवड करण्यात आली आहे.

## म्हसाई माता पतसंस्थेला बँको पुरस्कार

**धुळे –** येथील म्हसाई माता सहकारी पतसंस्थेला नुकतेच राज्यस्तरीय बँको ब्लू रिबन पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. यावेळी माजी सहकार आयुक्त चंद्रकांत दळवी यांच्या हस्ते अविनाश शिंत्रे, अशोक नाईक यांनी पुरस्कार स्वीकारला.

# नवीन सहकारी बँकांच्या निर्मितीस प्रोत्साहन देण्याची केंद्राची भूमिका - डॉ. जोशी



**सांगली –** केंद्र सरकार सहकार क्षेत्रातील धोरणात सकारात्मक बदल करीत असून नवीन सहकारी बँकाच्या निर्मितीस प्रोत्साहन देण्यात येत आहे. सरकारच्या वतीने लवकरच एक हजार नवीन सहकारी बँकाबाबत विचार सुरू आहे, असे सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी यांनी येथे सांगितले.

सहकार भारती, जिल्हा पतसंस्था फेडरेशन आणि जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशनच्या वतीने डॉ. जोशी यांचा मानपत्र प्रदान करून कर्मवीर नागरी सहकारी पतसंस्था अध्यक्ष रावसाहेब पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. सहकार भारती राष्ट्रीय पतसंस्था प्रकोष्ट प्रमुख म्हणून शिरीष देशपांडे यांची निवड झाल्याबद्दल सांगली अर्बन बँक अध्यक्ष गणेश गाडगीळ यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. जोशी म्हणाले, सहकार क्षेत्राला प्रोत्साहन देण्याचे काम केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा करीत आहेत. येत्या काही दिवसात काही सकारात्मक बदल दिसून येतील. मोठ्या पतसंस्थेचे बँकेत रूपांतर करण्याबाबत सहकार भारतीच्या वतीने पाठपुरावा करण्यात येत आहे.

गाडगीळ यांनी सांगितले की, डॉ. जोशी यांच्या सहकार क्षेत्रातील कामाचा अनुभव मोठा असून त्याचा लाभ सहकार क्षेत्राला नक्की होणार आहे. पाटील यांनी सांगितले की, पतसंस्था फेडरेशन तसेच सहकार भारती यांच्या संयुक्त प्रयत्नातून आगामी काळात आणखी चांगले काम उभे राहील. यावेळी गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्राचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी स्ट्रॅटेटिक मॅनेजमेंट यावर मार्गदर्शन केले.

सांगली जिल्हा पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष ए. डी. पाटील, सहकार भारती सांगली महानगर अध्यक्ष शशिकांत राजोबा, बँक फेडरेशन उपाध्यक्षा वैशाली आवाडे, सागर चौगुले, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष अरविंद मजलेकर, सांगली ग्रामीण अध्यक्ष सुमंत महाजन, भारत निकम यावेळी उपस्थित होते. सारिका मुले यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. महामंत्री शैलेश पवार यांनी सूत्रसंचालन आणि संजय परमणे यांनी आभार मानले.

# लेखिका वंदना धर्माधिकारी यांच्या 'मैत्री बँकिंगशी' पुस्तकाने अर्थसाक्षरतेस मदत



**पुणे :** ''सध्याच्या काळात अर्थसाक्षरता महत्त्वाची असून यासंबंधीची पुस्तके इंग्रजी भाषेत उपलब्ध असतात. बँकिंगसारखा क्लिष्ट विषय मराठीत सोप्या पद्धतीने मांडल्याने या पुस्तकामुळे अर्थसाक्षरतेस मदत होणार आहे,'' असे मत खासदार मेधा कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

लेखिका वंदना धर्माधिकारी लिखित 'मैत्री बँकिंगशी' या पुस्तकाच्या तेराव्या सुधारित आवृत्तीचे प्रकाशन खासदार मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी श्रीकांत जाधव, ब्राह्मण व्यावसायिक पत्रिकेचे संपादक भालचंद्र कुलकर्णी, लेखिका वंदना धर्माधिकारी, विजय धर्माधिकारी, मुकुंद जोशी, गिरीश सरदेशपांडे, आश्विनकुमार उपाध्ये, सुहास गोरे, साप्ताहिक सकाळचे संपादक माधव गोखले उपस्थित होते.

खासदार मेधा कुलकर्णी म्हणाल्या, ''सध्या वाचन कमी झाले आहे, असे म्हटले जाते. तसेच एआयच्या जमान्यात मराठी बँकिंग पुस्तकाची तेरावी आवृत्ती प्रकाशित होणे ही उल्लेखनीय बाब आहे. शेअर मार्केट, अर्थनीतीसंबंधी माहिती बरेचदा इंग्रजी भाषेत उपलब्ध असते.'' लेखिका धर्माधिकारी म्हणाल्या, ''२०१०मध्ये 'नाते बँकिंगशी' ही लेखमाला प्रसिद्ध झाली होती, त्याचेच हे पुस्तकरूप आहे. 'तीन बँकांनी' या पुस्तकाच्या विशेष आवृत्या खरेदी करून त्या आपल्या कर्मचाऱ्यांना, ग्राहकांना दिल्या आहेत. गुजराथी, हिंदी, कन्नड, इंग्रजी या भाषांत आणि ब्रेल लिपीतही या पुस्तकाचा अनुवाद झाला आहे.'' प्रास्ताविक साप्ताहिक सकाळचे संपादक गोखले यांनी केले.

# कॉसमॉस बँकेत दि नॅशनल को-ऑप. बँकेचे विलीनीकरण

**पुणे –** बंगलोर स्थित दि नॅशनल को-ऑप. बँकेचे कॉसमॉस सहकारी बँकेत नुकतेच विलीनीकरण करण्यात आले आहे. बँकेच्या सर्व म्हणजे १३ शाखा ग्राहक सेवेत रुजू झाल्या आहेत. अशी माहिती कॉसमॉस बँकेचे व्यवस्थापन मंडळ अध्यक्ष मिलिंद काळे यांनी सांगितली.

बँकेच्या व्यवस्थापन मंडळ अध्यक्षपदी काळे यांची नुकतीच निवड करण्यात आली. यामध्ये विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचा समावेश करण्यात आला आहे, तसे बँक अध्यक्ष प्रल्हाद कोकरे यांनी जाहीर केले. या मंडळाची नुकतीच पुनर्रचना करण्यात आली.

नॅशनल को-ऑप. बँकेचा एकूण व्यवसाय १३२६ कोटी असून विलीनीकरणाच्या प्रक्रियेमुळे ७९२ कोटी रुपयांच्या ठेवी सुरक्षित झाल्या आहेत. या विलीनीकरणामुळे कॉसमॉस बँकेचा विस्तार कर्नाटक राज्यात होण्यास हातभार लागला आहे. आजवर या बँकेत लहान मोठ्या अशा १९ बँका विलीन झाल्या आहेत. कॉसमॉस बँकेने ३५,४०० कोटी पेक्षा अधिक व्यवसाय केला आहे.

# पीपल्स को-ऑप. बँकेचा ७३ वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

**पुणे –** येथील पुणे पीपल्स को-ऑप. बँकेचा ७३ वा वर्धापनदिन नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने ग्राहक मेळायाचे आयोजन करण्यात आले होते.

बँकेने एकूण व्यवसायाचा २५८२ कोटींचा टप्पा पार केला आहे. त्यामध्ये ठेवी १५९८ कोटींच्या तर कर्ज ९८४ कोटी रुपयांची आहेत. बँकेची निव्वळ एनपीएची टक्केवारी शून्य टक्के आहे तर निव्वळ नफा १६ कोटी २० लाख आहे अशी माहिती बँकेचे अध्यक्ष सीए जनार्दन रणदिवे यांनी सांगितली. बँकेच्या संचालिका निशा करपे, श्वेता ढमाळ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. उपाध्यक्ष डॉ. रमेश सोनवणे यांनी स्वागत तर मुख्य कार्यकारी अधिकारी संजय भोंडवे यांनी आभार मानले.

# सहकार भारती सांगली जिल्हा (ग्रामीण) नूतन कार्यकारणी जाहीर



**सांगली –** सहकार भारती स्थापना दिनानिमित्त सहकार संवाद कार्यक्रम व सहकार भारती सांगली जिल्हा (ग्रामीण) यांच्या नूतन कार्यकारणीची घोषणा करण्यात आली. भारतीय रिझर्व बँकेचे संचालक व सहकार भारतीचे संस्थापक सदस्य सतीश मराठे यांनी महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील सहकाराचे स्थान या विषयावर मार्गदर्शन केले.

सहकार भारतीचे माजी प्रदेश अध्यक्ष प्रा. मुकुंद तापकीर, प्रदेश संपर्क प्रमुख संजय परमणे, विभाग प्रमुख चंद्रकांत धुळप, प्रदेश कार्यकारिणी सदस्य व तासगाव अर्बन बँकेचे अध्यक्ष महेश्वर हिंगमिरे, उदय परांजपे आणि संदीप माळी उपस्थित होते.

प्रास्ताविक संग्राम कुलकर्णी यांनी तर सूत्रसंचालन सारिका मुळे यांनी केले. या नूतन कार्यकारिणी पुढीलप्रमाणे – अध्यक्ष – सुमंत महाजन, उपाध्यक्ष – सर्वश्री सतिश भिंगे, संदीप माळी, महामंत्री – भारत निकम, कोष प्रमुख – चंद्रकांत खंकाळे, प्रसिद्धी प्रमुख – प्रशांत कुलकर्णी, संघटन प्रमुख – संग्राम कुलकर्णी, सह. संघटन प्रमुख – आनंदराव निकम, महिला प्रमुख – सारीका मुळे , महिला सहप्रमुख – स्नेहलता कुलकर्णी, संस्था संपर्क प्रमुख – अजितराव खराडे, पतसंस्था प्रकोष्ठ प्रमुख – जगदीश कालगावकर, सहप्रमुख – पोपटराव चौथे, बँक प्रकोष्ठ प्रमुख – श्रीकांत कुलकर्णी, विकास सेवा सोसायटी प्रकोष्ठ प्रमुख – विठ्ठल निकम, आडीट प्रकोष्ठ – दत्ता स्वामी.

गृहनिर्माण प्रकोष्ठ प्रमुख – श्रीशैल कोठावळे, सदस्य – सागर जाधव, लक्ष्मण चव्हाण, शिवप्रसाद शेंडे, डॉ. प्रदीप कोरे, कृष्ण कुलकर्णी यांची निवड झाली.

# प्रशिक्षित कर्मचारी, निरपेक्ष संचालक हा पतसंस्थेचा अविभाज्य घटक – अर्चना माळवे



**यवतमाळ –** स्पर्धेच्या युगामध्ये पतसंस्थेचा प्रशिक्षित कर्मचारी आणि निरपेक्ष मनाने काम करणारे संचालक हाच पतसंस्थेचा मुख्य आधार आहे. या दोन्हीच्या समन्वयाने कुठल्याही पतसंस्थेची भरभराट निश्चित होऊ शकते असे सहकार विभागाच्या जिल्हा सहाय्यक निबंधक अर्चना माळवे यांनी सांगितले.

सहकार भारती जिल्हा यवतमाळ आणि सहकार भारती प्रशिक्षण संस्था कराड यांच्या सहयोगाने जिल्ह्यातील सर्व नागरी, मल्टीस्टेट, पगारदार, महिला पतसंस्था संचालक, अधिकारी व कर्मचारी यांचे एक दिवसीय प्रशिक्षण येथे आयोजित करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन करताना त्या बोलत होत्या.

व्यासपीठावर यवतमाळ अर्बन को–ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष डॉ. नितीन खर्चे, गोदावरी मल्टीस्टेटचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, प्रदेश ग्रामीण प्रकोष्ट प्रमुख संजीव जोशी, जिल्हाध्यक्ष श्याम लोखंडे उपस्थित होते. भारत माता पूजन व दीप प्रज्वलन करून प्रशिक्षण कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले.

स्पर्धेच्या युगामध्ये टिकायचे असेल तर पतसंस्थांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून त्याचा योग्य वापर करणे, वसुली व्यवस्थापन आणि शाखा व्यवस्थापन यामध्ये कुठलीही तडजोड न करता पतसंस्थेचे कामकाज करावे, ग्राहकांशी असलेली वागणूक, तुम्ही त्यांना देत असलेल्या सेवा या सर्व गोष्टी महत्वाच्या आहेत, असे त्यांनी सांगितले.

डॉ. खर्चे यांनी पतसंस्थांच्या माध्यमातून दिनदयाळ उपाध्याय यांच्या अंत्योदय म्हणजेच समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न संस्थांनी करावा, प्रत्येकाचे जीवनमान उंचावेल याकरता प्रयत्न करावा, असे आवाहन केले.

प्रथम सत्रामध्ये पतसंस्था व्यवस्थापन या विषयावर गोदावरी मल्टीस्टेटचे व्यवस्थापकीय संचालक, राज्य पतसंस्था फेडरेशनचे तज्ञ संचालक धनंजय तांबेकर यांनी मार्गदर्शन केले. दुसऱ्या सत्रामध्ये वसुली व्यवस्थापन या विषयावर अकोला येथील तज्ञ मार्गदर्शक प्रकाश जाधव यांनी तर तृतीय सत्रात वसुलीतील कायदेशीर बाबींवर ॲडवोकेट रामेश्वर खोंड मार्गदर्शन केले.

सहकार बोर्डाचे तज्ञ संचालक कौडूजी नगराळे यांनी समारोपीय उद्बोधन आणि शंका निरसन केले. सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य यवतमाळ अर्बन कॉपरेटिव्ह बँकेचे संचालक अजय मुंदडा, अमरावती विभाग प्रमुख अमित भिसे उपस्थित होते. प्रशिक्षणाला प्रामुख्याने केशव नागरीचे दीपक दिकोंडवार, चंद्रशेखर खोंड, अनिल अक्केवार, जयंत भिसे पतसंस्थेचे अरुण भिसे, चैतन्य अर्बनचे यशवंत पाटील, जनता नागरीचे, अजय दंडे, बाळासाहेब पांडे पतसंस्थेचे अमोल बोदडे, जिल्हा परिषद पतसंस्थेचे तेजस तिवारी, नदिम पटेल, गजानन पोयाम उपस्थित होते.

सूत्रसंचालन सहकार भारती जिल्हा महामंत्री राम साकळे यांनी तर सहकार भारतीचे सदस्य संतोष गावंडे, नरेंद्र कौंडिन्य, शेखर भरारे यांनी परिश्रम घेतले.

# बँकिंग - फिजिकल नव्हे आता डिजिटल!

समाजामधील ज्यांच्याकडे अतिरिक्त पैसा आहे, तो ठेवीच्या स्वरूपात गोळा करून ज्यांना पैशाची गरज आहे, अशा समाजातील गरजू व्यक्तींना कर्जरूपाने देणे एवढाच बँकिंगचा मर्यादित अर्थ आहे. पूर्वी हा बँकिंग व्यवहार फिजिकल स्वरूपात होत असे. तंत्रज्ञानामध्ये फारशी प्रगती न झाल्याने व्यक्तिगतरीत्या बँकेमध्ये जाऊन बँकेच्या सर्व सेवा सुविधा घेतल्या जात असत. आज मात्र बँकिंगची ही परिस्थिती पूर्णपणे बदलली असून फिजिकल स्वरूपातील बँकिंग आता डिजिटल स्वरूपामध्ये रूपांतरित झालेले असल्याने घर बसल्या अगदी बँक बंद असताना देखील या सर्व सुविधा घेता येतात.



**गणेश निमकर**
**९८२२५ ६८५५०**

या सर्व स्थित्यंतरामध्ये बँकिंग व्यवसायाचे मूलतत्त्व जे आहे, त्यात बदल न होता बँकिंग व्यवसायाचे स्वरूप मात्र बदलत चालले आहे. सन २००० नंतर भारतातील बँकिंगमध्ये संगणकीकरणाची प्रक्रिया स्वीकारण्यात आली. सुरुवातीला या बदलासाठी बँकेतील प्रत्येक घटकांकडून विरोध होता. मात्र आज हळुहळू सर्वच स्तरावरती ही प्रक्रिया आता ती अपरिहार्यता झाली आहे. संगणकीकरणानंतर आज डिजिटल बँकिंगपर्यंत प्रवास होत असताना बँकिंग व्यवसायात अनेक स्थित्यंतरे झाल्याचे आपण पाहिले आहे.

डिजिटल बँकिंग येण्यापूर्वी बँकेमध्ये समक्ष जाऊन प्रत्येक व्यवहार करण्यामध्ये ग्राहक व बँक कर्मचारी यांचा मोठ्या प्रमाणात वेळेचा अपव्यय होत होता. आता मात्र कोणताही ग्राहक घरबसल्याच नव्हे तर त्याचे दैनंदिन कामकाज करत असतानाही मोबाईलवर एका बोटाच्या चुटकीसरशी बँकिंग व्यवहार करताना दिसत आहे. कोणताही व्यवहार हा जेवढा अधिकाधिक सुटसुटीत व सोयीस्कर होईल, तेवढी त्यातील जोखीम ही वाढत असते. डिजिटल बँकिंगदेखील याला अपवाद नाही.

पूर्वीच्या काळी बँकिंग व्यवहारातील जोखीम ही मर्यादित स्वरूपात होती. मात्र आज ती जागतिक स्तरावर गेली असून अमर्यादित स्वरूपात झाली आहे. आज आपण अनेक वर्तमानपत्रांमधून 'सायबर फ्रॉड' बद्दल बातम्या वाचत असतो. अनेक ठिकाणी या व्यवहारांमध्ये आवश्यक ती सतर्कता व दक्षता न पाळल्यामुळे सर्वसामान्य ग्राहकांची फसवणूक होताना आपल्याला दिसते. वास्तविक बँकांनी देखील अशा प्रकारचे बदल स्वीकारत असताना त्यांचे कर्मचारी व ग्राहकांमध्ये योग्य त्या पद्धतीने जनजागृती करणे आवश्यक असताना बँका मात्र या बाबतीत उदासीन असल्याचे दिसून येते. रिझर्व्ह बँक मात्र टी.व्ही. चॅनेल अथवा वर्तमानपत्रातून जाहिरातीचे माध्यमातून काही प्रमाणात जनजागृती करताना दिसते. बँकांनी मात्र या बाबतीत त्यांचे कर्मचारी यांना व्यक्तिगत पातळीवर तर ग्राहकांना त्यांचे मेळावे अथवा प्रशिक्षण शिबिरे घेऊन याची व्यापक प्रमाणात जनजागृती करणे आवश्यक आहे.

अशा प्रकारच्या सायबर वाढत्या गुन्हेगारीमुळे भविष्यात बँकांवरील विश्वासार्हता कमी होण्याची फार मोठी भीती आहे. बँकिंग व्यवस्था कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेमधील प्रमुख घटक असल्याने अशी विश्वासार्हता कमी होणे हे कोणत्याही देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी घातक आहे, याची जाणीव ठेवून त्या गांभीर्याने यासाठी सर्व स्तरांवर सर्वतोपरी प्रयत्नांची आवश्यकता आहे.

एखादी बँक आर्थिकदृष्ट्या अडचणीत आल्यानंतर ठेवीदाराला रिझर्व बँकेने रुपये पाच लाखांपर्यंत ठेव संरक्षण दिलेले असले तरी सायबर सुरक्षा अभावी एखादी बँक अडचणीत आल्यास ठेवीदाराला अशा प्रकारचे कोणतेही संरक्षण नाही. याबाबतही रिझर्व बँकेने विचार करून बँकांवर याच्या संदर्भात काही बंधने आणणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे ग्राहकांना संरक्षण मिळाल्यास त्याचा बँकिंग क्षेत्रावरील विश्वासार्हता वाढण्यास नक्कीच मदत होईल. ही बाब अधिक खर्चिक व गुंतागुंतीची असली तरी या संदर्भात रिझर्व्ह बँक अथवा केंद्र सरकारकडून ठोस उपाय अपेक्षित आहेत. अनेक वेळा बँकेच्या सदोष संगणक व सायबर सुरक्षा यंत्रणेमुळे ग्राहकांना मोठा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, ही सध्याची वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही.

सन २०२० नंतर कोरोनाच्या पार्श्वभूमीवर डिजिटल व्यवहारांचे प्रमाण वाढण्यास सुरुवात झाली. सद्यस्थितीत भारतीय बँकिंगमध्ये डिजिटल व्यवहारांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. सन २०१६ मध्ये दाखल झालेल्या यू.पी.आय. (UPI) ने सन २०२३-२४ पर्यंत एकूण डिजिटल व्यवहारामध्ये आर.टी.जी.एस/एन.ई.एफ. टी., आय.एम पी.एस. अशा इतर डिजिटल व्यवहारांपेक्षा अधिक लोकप्रियता मिळवली असून त्याचे एकूण डिजिटल व्यवहारांमध्ये ७५ टक्क्यांपेक्षा अधिक योगदान आहे. आज कोणताही सर्वसामान्य व्यक्ती यू.पी.आय. (UPI) चे माध्यमातून आपणास डिजिटल व्यवहाराशी जोडलेला दिसेल. आर्थिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये यूपीआयची रोजची सरासरी व्यवहार संख्या ३६ कोटी असून रोजची सरासरी व्यवहार रक्कम रु. ५६६०८ कोटी आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये नोव्हेंबर २०२४ अखेरचे कालावधीमध्ये एका महिन्यात रोजची सरासरी व्यवहार संख्या ५३ कोटी झाली असून रोजची सरासरी व्यवहार रक्कम रु. ७५००० कोटी आहे. मार्च २०२५ पर्यंत रोजची सरासरी व्यवहार संख्या ७० कोटींपर्यंत अपेक्षित असून, मार्च २०२७ अखेर रोजची सरासरी व्यवहार संख्या १०० कोटींपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. १ डिसेंबर २०२२ रोजी CBDC (central bank digital currency) लाँच झाल्यापासून दि. ३१.०३.२०२४ पर्यंत त्यातील एकूण व्यवहारांची संख्या २.३४ कोटींवर पोहोचली असून यामधील सहभागींची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

भारतीय बँकांनी आता आपल्या एकूण व्यवहारांमध्ये डिजिटल व्यवहारांचे प्रमाण किती आहे? त्यामध्ये किती रोज किती वाढ होत आहे हे पाहून फिजिकल व्यवहार हे डिजिटल व्यवहारामध्ये रुपांतरित करण्याचे नियोजन करून त्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. ऑस्ट्रेलियामधील एका बँकेने नुकतेच आपल्या सर्व शाखा बंद करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय घेताना त्यांनी त्यांच्या एकूण बँकिंगमधील डिजिटल व्यवहारांचे प्रमाण ९७% असल्याने व केवळ ३% फिजिकल व्यवहार करणाऱ्या ग्राहकांसाठी बँकेचा शाखांमधील होणारा खर्च परवडण्यासारखा नसल्याने शाखा बंद करण्याचा निर्णय घेतल्याचे स्पष्टीकरण दिले. भारतामध्ये ही परिस्थिती यायला फारसा वेळ लागणार नाही. आजही अनेक बँका कार्यक्षेत्र आणि शाखा विस्तार या माध्यमातून व्यवसायवृद्धीच्या संकल्पनेतून बाहेर आलेल्या नाहीत. तंत्रज्ञानामुळे भौगोलिक कार्यक्षेत्र ही मर्यादा आता राहिलेली नाही. भारतीय बँकांनी ही मानसिकता बदलणे आवश्यक आहे.

डिजिटल व्यवहार स्वीकारण्याशिवाय आता कोणालाच पर्याय नसल्याने बँका व ग्राहक यांनी यामधील सुरक्षितता कशी जपता येईल व हे व्यवहार अधिकाधिक जोखीम मुक्त कसे होतील हे पाहणे आवश्यक आहे. खरे म्हणजे शासनापासून ग्राहकांपर्यंत सर्वांचीच ही सामुहिक जबाबदारी आहे हे विसरून चालणार नाही.

**- गणेश निमकर,**
**बँकिंग सल्लागार पुणे**
**मो.- ९८२२५ ६८५५०.**

*****

# बँक कर्जाची एकरकमी परतफेड; कर्ज क्षेत्रासाठी मार्गदर्शक पुस्तक

बँकिंग क्षेत्र, कर्जाची उपलब्धता, त्याची एक रकमी परतफेड, आणि कर्जदारांना मिळणाऱ्या सवलती तसेच एनपीएची संकल्पना हा विषय खरे तर खूप व्यापक पण तितकाच आवश्यक व महत्त्वपूर्ण असा आहे. मात्र या विषयाची मांडणी साध्या, सोप्या भाषेत करण्याचा प्रयत्न महेश सहकारी बँकेचे सरव्यवस्थापक श्रीकांत जाधव यांनी या पुस्तकाच्या माध्यमातून केला आहे. एक रकमी कर्ज परतफेड योजना आणि कर्जदारांना मिळणाऱ्या सवलती आणि एनपीए संकल्पना याबाबतचे सविस्तर विवेचन पुस्तकात करण्यात आले आहे.




या विषयाची आवश्यकता लक्षात घेऊन लेखक जाधव यांनी एकूण ३० विषय पुस्तकात मांडले आहेत. त्यामध्ये एकरकमी कर्ज परतफेड, तडजोड योजना मार्गदर्शक तत्त्वे आणि त्याबाबतच्या महत्त्वाच्या सूचना, योजनेचे फायदे आणि तोटे, तडजोड रक्कम कशी निश्चित करण्यात येते. या योजनेसाठीची नियमावली तसेच योजनेबाबत तयार करायचा प्रस्ताव, त्यासाठीचे मंजूरी आणि स्वीकृती पत्र, लघु आणि मध्यम उद्योग आणि कर्ज परत फेड योजना, तडजोड योजनेबाबत सूचना ही योजना आणि कर्जदार, योजनेबाबतचे समाज आणि गैरसमज, याबाबत आरबीआयची मार्गदर्शक तत्वे आणि शासन निर्णय, एनपीए बाबत आरबीआयचे परिपत्रक, एनपीएची पूर्वपीठिका, संपत्तीचे वर्गीकरण, कॅश क्रेडिट स्वरूपाची कर्ज आणि एनपीए निकष, हे निकष लागू नसलेली कर्ज, शेती कर्ज आणि निकष, एनपीए होण्याची करणे, त्याचे परिणाम, एनपीए वसुलीचे व्यवस्थापनाचे विविध मार्ग, सहकारी बँकासाठी आरबीआयचे तडजोड धोरण आणि बुडित कर्ज धोरण आदि विषय मांडले आहेत.

पुस्तकातील अखेरच्या प्रकरणात प्रश्न आणि उत्तराच्या माध्यमातून शंका निरसन करण्याचा प्रयत्न हा नक्कीच स्वागतार्ह आहे. पुस्तकाचे लेखक जाधव यांनी मनोगताच्या माध्यमातून पुस्तक लेखनामागची भूमिका मांडली आहे. याआधी पुस्तकाच्या चार आवृत्या प्रकाशित झाल्या आहेत. या पुस्तकात संख्यात्मक माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे तर काही प्रकरणे इंग्रजी भाषेतून प्रकाशित करण्यात आली आहे. बदलत्या स्थितीमधील कर्ज परतफेडीची स्थिती आणि त्यावरील उपाययोजना याबाबतचे विश्लेषण करण्यात आले आहे, ते नक्कीच उपयुक्त आहे. या पुस्तकाला माजी सहकार आयुक्त अनिल कवडे यांची प्रस्तावना आहे. पुस्तकाची किंमत ४४० रुपये इतकी आहे.

**पुस्तक परीक्षण**

# 'मैत्री बँकिंगशी' पुस्तक बँकिंग क्षेत्रासाठी उपयुक्त

मैत्री हा शब्द ऊच्चारला की एक प्रकारची संकल्पना अथवा चित्र डोळ्यासमोर उभे राहते. या एका शब्दामुळे मानवी नात्यांनात्यातील व्यापकता, स्नेहबंध मनात पिंगा घालू लागतात. पण ज्यावेळी मैत्री शब्द बँकेशी जोडला जातो, त्यावेळी भावना व्यवहारात बदलतात. ही मानसिकता बदलण्यासाठी 'मैत्री बँकिंगशी' हे पुस्तक उपयुक्त ठरणार आहे.




लेखिका वंदना धर्माधिकारी यांच्या 'मैत्री बँकिंगशी' पुस्तकाची १३ वी सुधारित आवृत्ती नुकतीच प्रकाशित करण्यात आली. बदलत्या काळानुसार बँकिंग क्षेत्रात वेगाने होत असणारे बदल, नवीन तंत्रज्ञान, याचाही मागोवा या पुस्तकाच्या माध्यमातून घेण्यात आला आहे. जो आजच्या काळात बँकिंग व्यवहाराशी निगडित असणाऱ्या सर्वांना उपयुक्त ठरणारा आहे, असे म्हणता येईल. दोनशे चाळीस पानी पुस्तकात विविध विषयांची मांडणी करण्यात आली आहे. यामध्ये भारतीय चलन - रुपया, विमुद्रीकरण - एक क्रांती, बँक ठेवी, प्लास्टीक मनी, ई-बँकिंग आणि एनपीसीआय, कॅशलेस, जीएसटी आणि फसवणूक, अनिवासी भारतीय, सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी, सुवर्णवृद्धि, सुरक्षित ठेव कक्ष, नामांकन इच्छापत्र आणि इतर, वित्तीय समावेशन आणि जन - धन योजना, कर्ज पहावे घेऊन, शैक्षणिक कर्ज, सूक्ष्म, लहान. आणि मध्यम उद्योजक, स्वयंसहायता बचत गट, शेती वित्त सहाय्य, सहकारी बँका आणि प्राथमिक कृषि पतसंस्था, पतसंस्था, एकात्मिक बँकिंग लोकपाल योजना, भारतीय रिझर्व्ह बँक आणि बँकिंग संक्षिप्त रूपे अशा विविध प्रकरणांचा आढावा पुस्तकात घेण्यात आला आहे.

पुस्तकाची एकूण पाने २४० असून त्याची मांडणी अश्विनी महाजन यांनी केली असून पुस्तकाची प्रथम आवृत्ती सन २०११ मध्ये प्रकाशित करण्यात आली होती. पुस्तकाला दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी आणि सचिव सायली भोईर यांची प्रस्तावना असून आरबीआय संचालक सतीश मराठे यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच लेखिका वंदना धर्माधिकारी यांचे मनोगत यामध्ये आहे.

२०२४
७५
अमृत महोत्सव
25 K वर्गणीदार

कर व व्यापारी विषयक कायद्यातील क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत माहितीसह आर्थिक गुंतवणूक, आरोग्याविषयी माहिती देणारे व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

स्थापना १९५०

**व्यापारी मित्र**

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा

मासिकाची वर्गणी खालील प्रकारे भरु शकता.

| | वर्ष ३ | वर्ष २ | वर्ष १ |
|---|---|---|---|
| साध्या पोस्टाने | १९०० | १३०० | ७०० |
| रजिस्टर पोस्टाने | २६०० | १७८० | ९४० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे - ४११००४
फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290
E-mail : sampadak@vyaparimitra.com

# नागरी सहकारी बँका, ठेव वाढीवर अधिक लक्ष देण्याची गरज

रिझर्व बँकेने नागरी सहकारी बँका संदर्भात प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार सन २०२२-२३ या वर्षात नागरी सहकारी बँकांच्या ठेवींमध्ये दीड टक्का वाढ झाली होती. सन २३-२४ या वर्षात ठेववाढीचे प्रमाण ४.९० टक्के इतके होते. याच काळात अन्य बँका म्हणजे व्यापारी, खासगी या बँकांच्या ठेववाढीचा सरासरी दर १४ टक्के होता. यापैकी लघु वित्त बँकांच्या ठेववाढीचा दर ३१ टक्के आहे. तर याच काळातील राष्ट्रीयीकृत बँकांच्या ठेववाढीचा दर दहा टक्के इतका आहे.



**डॉ. अभय मंडलिक**
९४०३० ८०७२५

एका वृत्तपत्राने ऑक्टोबर महिन्यातील बँकिंग उद्योगाचा आढावा घेताना ठेव वाढीचा एकूण दर ११.७४ टक्के इतका असल्याचे कळविले आहे. ही वाढ मागील वर्षीच्या ऑक्टोबर महिन्याच्या तुलनेतली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर नागरी सहकारी बँकांना आपल्या ठेववाढ या विषयावर अत्यंत गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.

बँकिंग क्षेत्रातील अन्य बँकांना ठेवी मिळत असतील आणि नागरी सहकारी बँकांना त्या तुलनेने कमी प्रमाणात ठेवी मिळत असतील तर त्याची कारणे शोधली पाहिजेत. त्यावर उपाययोजनाही केली पाहिजे.

**❊ ठेवी कमी होण्याची कारणे -**

नागरी सहकारी बँकांचा विचार करून ठेवी का कमी होत आहेत याची कारणे शोधल्यास पुढील काही मुद्दे लक्षात घ्यावे लागतील. मागील तीन वर्षात रिझर्व बँक ऑफ इंडियाने सर्व बँकांवर दंडात्मक कारवाई करणे सुरू केले आहे. दुर्दैवाने या बाबतीत नागरी सहकारी बँकांवर याचा प्रत्यक्ष ठेवींचा ओघ आटण्यावर किंवा असलेल्या ठेवी कमी होण्यावर झालेला आहे. एखाद्या बँकेवर दंडात्मक कारवाई झाल्यानंतर अन्य नागरी सहकारी बँकांवर त्याचा नकारात्मक परिणाम झाला आहे. ही वस्तुस्थिती आहे. ठेवीदार आता आपल्या हक्कांबाबत आणि ठेवींच्या सुरक्षिततेबाबत अत्यंत जागृत झालेले असल्यामुळे काही भागात पाच लाखाच्या वर एका नागरी सहकारी बँकेत ठेवी ठेवायच्या नाहीत, अशा अर्थाची विचारधारा मूळ धरत असल्यामुळे ठेवीचे प्रमाण घटते आहे किंवा वाढीला मर्यादा पडत आहेत. यावर उपाय म्हणजे खातेदारांना बँकेच्या आर्थिक स्थितीबाबत खात्री पटविणे. हे काम ठेवींची चौकशी करायला आल्यानंतर अत्यंत काळजीपूर्वक करण्यात आले पाहिजे. खातेदारांच्या शंकांचे योग्य निरसन काउंटरवर होत नसल्यास अधिकारी, शाखाधिकारी वर्गाकडून होणे अपेक्षित आहे.

**❊ गुंतवणुकीचे अन्य पर्याय -**

मागील अनेक वर्षांपासून बँकांमधील ठेवी या शेअर बाजारामध्ये जात आहेत. शेअर बाजाराकडून उत्तम परताव्याचे आश्वासन तसेच शेअर्सच्या किमतीमध्ये होत असलेली वाढ या प्रलोभनामुळे गुंतवणुकीचा अन्य पर्याय म्हणून शेअर बाजाराकडे बघण्यात येते. या गुंतवणुकीबाबत माऊथ पब्लिसिटीने जास्त आक्रमक प्रचार करण्यात येतो. कमी दिवसांत जास्त परतावा मिळाल्याची अपवादात्मक उदाहरणे दिली जातात आणि त्यातून बँकांच्या ठेवीचे रूपांतर शेअर्समध्ये होते ही सध्याची वस्तुस्थिती आहे. बँकांनी अशावेळी या गुंतवणुकीमधील जोखिमा स्पष्ट केल्या पाहिजेत, तसेच शेअरमधली गुंतवणूक ही तरल नसते, हे खातेदारांना पटवून सांगितले पाहिजे. बँक ठेवींच्या तुलनेत शेअर्सवर कर्ज मिळणे तुलनेने अवघड असते, हेही त्यांना सांगितले गेले पाहिजे. परताव्याबद्दलच्या अवास्तव आश्वासनांबद्दलही वस्तुस्थिती सौम्य शब्दात सांगितल्यास शेअर बाजारात जाणाऱ्या ठेवी काही प्रमाणात थांबविता येतील.

**❊ म्युच्युअल फंड्स -**

म्युच्युअल फंडामधील गुंतवणूक ही जोखीम असते असे प्रत्येक जाहिरातीत नमूद केलेले असले तरी म्युच्युअल फंडामधील गुंतवणुकीचा ओघ मागील काही वर्षांत सातत्याने वाढत आहे. एस.आय.पी. या प्रकारच्या गुंतवणुकीला गुंतवणूकदार जास्त प्राधान्य देत असून त्यात बँकांपेक्षा अधिक परतावा आहे असा दावा करण्यात येतो. काही म्युच्युअल फंडांच्या बाबतीत ते खरे असले तरी सर्वच म्युच्युअल फंड हे चांगला परतावा देतातच असे नाही. म्युचअल फंडातील गुंतवणुकीबाबत तरलता बँकांच्या ठेवींइतकी नसते ही माहिती खातेदारांना दिली गेली पाहिजे.काही योजनांमधून बाहेर पडताना बरीच मोठी रक्कम कापली जाते, असाही अनुभव आहे.

**❊ बँकांनी तंत्रस्नेही होण्याची गरज -**

स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी बँकांना तंत्रस्नेही होण्याची नितांत आवश्यकता आहे.

अन्य बँका ज्या प्रकारच्या सुविधा देतात त्या बहुतांशी सुविधा आपल्या बँकेत कशा देता येतील हा विचार केला पाहिजे. यापैकी डेबिट कार्ड, एटीएम, मोबाईल बँकिंग, इंटरनेटवरून खाते उतारा, एसएमएस सर्विस या साऱ्या सेवा सहजपणे देता येऊ शकतात. याव्यतिरिक्त तंत्रज्ञानावर आधारित अन्यसेवांचा बँकांनी निश्चितपणे विचार करावा.

नागरी सहकारी बँकेचा ग्राहक मुख्यत्वे करून ज्येष्ठ नागरिक हाच आहे. ही रचना हळुहळू बदलून तरुण खातेदार बँकेकडे कसे येतील यासाठी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. यासाठी तरुणांना ज्या सेवांचे आकर्षण आहेत, त्या सेवा देण्याबाबत बँकांनी विचार करावा आणि तशी तरतूदही करावी.

**❊ ठेव वाढीचे महत्त्व -**

बँकिंगच्या व्याख्येमध्ये ठेवी स्वीकारून कर्ज देणे हा महत्त्वाचा भाग आहे. यामध्ये ठेवी स्वीकारणे हे अधिक महत्त्वाचे आहे, कारण ठेवी असल्याशिवाय कर्ज व्यवहार करता येणार नाही. यासाठी ठेवींचा ओघ सतत वाढता कसा राहील यासाठी नागरी सहकारी बँकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी हे आवश्यक आहे. संचालक मंडळांनी याबाबतीत गंभीरपणे चर्चा करून ठेववाढीसाठी सातत्याने प्रयत्न केले पाहिजेत.

**- डॉ. अभय मंडलिक**

**(लेखक खामगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक व बँकिंग क्षेत्राचे अभ्यासक आहेत.)**

❊❊❊❊❊



# दिशाभूल आणि नुकसान भाग - १



कोणालाही फोन करायचा असला की आधी एक निवेदन ऐकावे लागते, नंतर त्या नंबरवर रिंग जाते. असे मागील बरेच दिवस आपण सगळेच ते ऐकत आहोत. सोशल मिडिया वा इन्व्हेस्टमेंट - हा दिर्घ मेसेज सगळ्यांनी ऐकला आहे. त्याने किती स्तरापर्यंत दिशाभूल करणारे बिनधास्तपणे सर्वसामान्य जनतेला त्रास देत आहेत. याचा अंदाज इथे येत आहे. मूड्याच्या टाळूवरील लोणी चाटून खाणे. ही एक म्हण आहे. जिथे विचारशक्ती नासलेली असते, तिथे असे विघातक नकारात्मक कृत्यांचा भरमसाठ चंगळवाद फुगतो. असा एक व्हिडीओदेखील अनेकांनी बघितला असेल. त्यात आहे. वडील हॉस्पिटलमध्ये मृत्यावस्थेत आहेत. मुलगी रडत रडत पुढील सर्व विधी कार्य करण्यासाठी मदत करणाऱ्या एजन्सीला फोन लावते आणि काय व कसे विचारते. तिला अतिशय शांतपणे आधार देणाऱ्या शब्दांनी तिची पुढील काळजी दूर केली जाते. शेवटी इथे इथे इतके पैसे पाठवा, ओटीपी सांगा होते. त्यानंतर काही क्षणाचे आत भराभरा मेसेजेस येतात, आणि प्रत्येक वेळी फक्त आकडे दिसतात.



वंदना धर्माधिकारी
९८९०६ २३९१५

अशा प्रकारे अनेकविध प्रकारे फसवणूक करणारे मेसेजेस, इ-मेल्स, फोन येतात. पाठवणारे अतिशय हुशार असतात, टेक्नॉलॉजीचे पक्के असतात. त्यांच्या डोक्यातून निघणाऱ्या क्लृप्त्या कल्पनाशक्तीच्या बाहेर असतात. समजत नाही, कसे धजावतात काहीही करून दुसऱ्याला फसवायला? तेव्हा आपणच अधिक सावध राहण्यासाठी सरकार खाते मोबाईल वरून निवेदन करीत आहेत. पोलीस खातेदेखील वरचेवर संपर्क साधून जनजागृती करीत आहेत. वर्तमानपत्रात अशा गोष्टी वरचेवर येतात. मार्गदर्शन करणारे या लेखासारखी लेख बरेच सापडतात. कार्यक्रम घेतले जातात. यातून आपल्याला खूप काही माहिती मिळते. आपले नेहमीचे फोन सोडून इतर कुठलेही फोन पटकन उचलून बोलायचे नाही हे पथ्य पाळणे आता अत्यावश्यक होताना दिसते. खूप प्रकार आहेत, पेपर उघडला की प्रतिदिन दैनंदिन भविष्यासारखे असतात. तेव्हा, ती मंडळी कुठेही वाहत जाणारी आहे. व्हॉटसॲपवर फिरतात, इंटरनेट खेळ असतो त्यांचा. सहज नजरेस पडतातच, मग बघावेच लागतात, वाचले जातात, भीती वाटते, काय करायचे अशा वेळी? प्रश्न? प्रश्न?? प्रश्न???

फसवले गेले असाल तर --- हे असे करायचे असते --- सर्वसामान्य माणूस इतकेच करू शकतो. पुरते तेवढे. इथे काही टिप्स देते. आपोआप जाण येते, कोणीतरी हितचिंतक असतात अवतीभवती. तेव्हा, घाबरून न जाता पुढील गोष्टी कराव्या लागतात. काही तर अगदी वेळ न घालवता करणे भाग असते. तेव्हा काय हवे नको ते तर बघून घ्या आधी....

१. जेव्हा काही चुकीचे लक्षात येते तेव्हा प्रथम कोणी घरात असेल तर संवाद साधताना एकीकडे तक्रार नोंदवायची असते. खात्यांचे बारकावे, कार्डचे बारकावे जवळ घेऊन शक्य तितक्या लवकर https://cybercrime.gov.in या संकेत स्थळावर तक्रार नोंदवावी. बरोबर कोणी असेल तर जरा धीर येतो म्हणून असावे माणूस बरोबर.

२. युपीआय, जीपे, पेटीएम, भीम पे या माध्यमातून व्यवहार करताना काही चुकीचे झाले, काही लक्षात आले नाही, घोटाळा झाला असल्यास हे सर्व बघणारी प्रमुख संस्था - एनपीसीआय येथे आणि आपली बँक जिथे खाती आहेत तिथे तक्रार नोंदवावी ::

https://www.npci.org.in/what-we-do/upi/dispute-redresal-mechanism

३. १९३० आणि १५५२६० नंबरवर संपर्क साधून संपूर्ण जे झाले असेल ते ओळीने त्याचा तपशील बारकाव्याने द्यावा. ही यंत्रणा ज्या कोणाच्या खात्यात पैसे गेले असतील, ते खाते गोठवण्याचे तातडीने प्रयत्न करतात. ते पैसे थोपवले जातात.

४. ऑनलाईन तक्रारींचे कागद घेऊन नजीकच्या पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवावी. तक्रार ईमेल द्वारे जाते. त्याचे प्रिंट काढावे, शिवाय पुढील जे जे म्हणून कागद गोळा होतील त्याच्याही प्रती काढून एका फाईलमधे तारीखवार लावावे. आपले रेकोर्ड अधिकाधिक नीटनेटके असल्याने तपासास फायदा होतो.

५. आपले सर्व ठिकाणचे, कार्डचे, मोबाईल बँकिंगचे, पासवर्ड लगेचच तातडीने बदलावेत.

एकीकडे ते डायरीमध्ये नमूद करावेत. सगळे करताना घाई होते, भीती तर असतेच, म्हणून एकाबाजूला नोंद ठेवली की बरे पडते.

६. जर फोनच हॅक झाला असेल, अशी शंका जरी आली तरी ताबडतोब मोबाईलमधील सीमकार्ड बदलावे.

बँकेतून तुम्हाला काही करायला सांगितले तर त्वरित कृती करणे हिताचे असते. एकूणात अत्यावश्यक सर्व गोष्टी कमी वेळात, योग्य कराव्या लागतात. इथे आणखीनही खूप काही सांगायचे आहे. बाकीचे पुढील भागात लिहणार आहे. तरी असे संकट आले म्हणून हातपाय गाळून बसू नये. असे अनेक लोक या संकटांशी सामना करतात. आयुष्यात अनेक संकटे येतातच. तेव्हा खचून न जाता आपले नियमित कर्म पहिल्यासारखे करीत राहावे.

उरलेले पुढील लेखात.... भाग २ मध्ये

**- वंदना धर्माधिकारी**
Vandana10dyahoo.co.in
M² : 9890623915

*****

# गृहरचना संस्था
# शंका समाधान
## अपार्टमेंट कायदा - १९७०





अॅड. जयंत कुलकर्णी
९४२२० ०७५१०

**अपार्टमेंट संघाचे उपविधी (बायलॉज)**

**व्यवस्थापन समिती - प्रकरण ४**

*** नियम क्र. २७ – नैमित्तिक बैठका –** प्रत्येक अपार्टमेंट संघाच्या व्यवस्थापक समितीची बैठक वर्षातून किमान २ (दोन) वेळा तरी आयोजित केली पाहिजे. त्यासाठी संघाच्या व्यवस्थापकाने प्रत्येक व्यवस्थापक समिती सदस्याला नियमित बैठकीची पूर्व-सूचना किमान ३ (तीन) दिवस अगोदर लेखी किंवा ई-मेलने किंवा पोस्टाने किंवा व्यक्तिश: (समक्ष) देणे बंधनकारक आहे. त्यामध्ये सभेची वेळ, तारीख, ठिकाण, कार्यक्रम पत्रिकेचा तपशील असणे आवश्यक आहे.

*** नियम क्र. २८ – विशेष सर्वसाधारण सभा –** व्यवस्थापक समिती, सदस्यांपैकी किमान ३ (तीन) व्यवस्थापक समिती सदस्यांनी विशेष सभेची मागणी केल्यास संघाचे अध्यक्ष किंवा सचिव विशेष सर्व साधारण सभा ३ (तीन) दिवसांच्या पूर्वसूचनेने बोलावू शकतील. त्याप्रमाणे लेखी नोटिस प्रत्येक व्यवस्थापक समिती सदस्याला ई-मेलने पोस्टाने किंवा व्यक्तिश: पाठवतील. त्यामध्ये सभेचा विषय, ठिकाण व वेळ याचा उल्लेख असेल.

**टीप –** विशेष सर्वसाधारण सभेमध्ये एकच विषय विषयपत्रिकेत असेल.

*** नियम क्र. २९ –** तातडीच्या कामासाठी/निर्णयासाठी व्यवस्थापक समितीची बैठक बोलवावयाची झाल्यास प्रत्यक्ष सभेची नोटिस न काढता सभा/बैठक बोलावली असल्यास व तिला जास्तीत जास्त व्यवस्थापक समिती सदस्य व व्यवस्थापक उपस्थित राहिल्यास सभेची नोटिस प्रत्यक्ष दिली असे गृहीत धरून सदर सभेचे कामकाज कायदेशीर म्हणून ग्राह्य धरले जाईल व त्या सभेचे कामकाज कायदेशीर असे होईल.

*** नियम क्र. ३० – गणसंख्या (कोरम) –** सर्व व्यवस्थापक समितीच्या बैठकीला व्यवस्थापन समिती सदस्य संख्येच्या १/३ (एकतृतीयांश) सदस्यांची उपस्थिती सभेच्या गणपूर्ततेसाठी आवश्यक राहील. जर गणसंख्येची पूर्तता झाली नाही तर उपस्थित व्यवस्थापक समिती सदस्यांनी सदर सभा तहकूब करून पुन्हा थोड्या वेळाने घ्यावी. थोड्या वेळाने किंवा नंतर म्हणजे तहकुबीनंतर बोलावलेल्या सभेला गणसंख्येचा आवश्यकता राहणार नाही. त्यावेळी प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या व्यवस्थापक समिती सदस्यांमध्ये सभेचे कामकाज चालवता येऊ शकेल व ते कायदेशीर असेल.

*** नियम क्र. ३१ – बंधपत्र (फिडेलिटी बॉण्ड) –** अपार्टमेंट संघाच्या कामकाजासाठी तसेच व्यवस्थापनासाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांनी किंवा जो रोखीचे (कॅश) व्यवहार व बँक व्यवहार पाहतो, त्याने आपला स्वत:चा फिडेलिटी बॉण्ड म्हणजे रु. २००/- च्या अथवा रु. ५००/- च्या मुद्रांकावर (स्टॅम्प पेपर) भरून दिले पाहिजे. त्यामध्ये अपार्टमेंट संघाच्या किती रकमेचा व्यवहार तो पाहणार आहे, त्या प्रमाणात त्याने नुकसान भरपाई घेण्याच्या दृष्टीने त्या रकमेएवढे बंधपत्र भरून दिले पाहिजे, तरच आर्थिक नुकसान झाल्यास संबंधितांकडून रक्कम वसूल करता येऊ शकेल.

*** अपार्टमेंट कायद्यातील व्यवस्थापन समिती –** अपार्टमेंट संघाच्या व्यवस्थापन समितीमध्ये काम करण्यासाठी निवडलेल्या पदाधिकाऱ्यांनी काय काय काम करावे याचे सविस्तर विवेचन या प्रकरणात दिलेले असून त्यानुसार संघाचे कामकाज चाळावे अशी अपेक्षा आहे. बऱ्याच अपार्टमेंट संघांना पदाधिकाऱ्यांनी कोणकोणती कामे करावी याबाबत माहिती नसते. म्हणून प्रथम याचा अभ्यास करावा अशी अपेक्षा.

*** नियम क्र. ३२ –** प्रत्येक अपार्टमेंट संघाची स्थापना झाल्यावर खालील व्यक्ती निवडाव्या लागतात. – **१) अध्यक्ष** – १ पद **२) उपाध्यक्ष** – १ पद **३) सचिव** – १ पद **४) खजिनदार** – १ पद.

या व्यतिरिक्त आवश्यकता भासल्यास सहाय्यक खजिनदार किंवा सहाय्यक सचिवाचे पददेखील संघाला, भरता येऊ शकेल. सर्वसाधारणपणे १०० व्या वर सभासदांची संख्या असेल तेथे जादा पदांची आवश्यकता असते.

*** नियम क्र. ३३ –** व्यवस्थापक समिती संघाचे कामकाज चालवण्यासाठी दरवर्षी सदस्यांची निवड करेल व त्यांचा कालावधी व्यवस्थापक समिती ठरवेल.

*** नियम क्र. ३४ –** व्यवस्थापक समितीच्या बहुमताने समिती सदस्याला काढून टाकता येऊ शकते. त्यासाठी कोणते कारण असो किंवा नसो. त्यानंतर नवीन सदस्यांची निवड पुढील सभेमध्ये करता येते. त्यासाठी स्वतंत्र सभादेखील बोलावता येऊ शकते.

*** नियम क्र. ३५ – अध्यक्षाचे अधिकार –** प्रत्येक अपार्टमेंट संघाचा अध्यक्ष संघाचा प्रमुख काम करेल व प्रत्येक सभेचे अध्यक्षस्थान भूषवेल आणि सभेचे कामकाज पाहील. तसेच तो त्याच्या अधिकारात अपार्टमेंट धारकामधून कोणालाही व्यवस्थापक समिती सदस्य म्हणू निवडू शकेल. अध्यक्ष म्हणून तो त्याचे संपूर्ण अधिकार संघाचे व्यवस्थापन योग्य प्रकारे चालवण्यासाठी वापरेल.

**नियम क्र. – ३६ – उपाध्यक्षाचे अधिकार –** प्रत्येक अपार्टमेंट संघाचा उपाध्यक्ष ज्यावेळी संघाचा अध्यक्ष उपलब्ध नसेल किंवा तो काम करू शकत नसेल तर त्याच्या जागी बसून संघाचे कामकाज चालवेल. कर अध्यक्ष व उपाध्यक्ष दोघेही उपलब्ध होत नसतील किंवा काम करू इच्छित नसतील तर तात्पुरती सोय म्हणून व्यवस्थापक समितीमधील कोणी एक व्यक्ती संघाचे कामकाज चालवेल; पण संघाचे दैनंदिन कामकाज खोळंबणार नाही.

**नियम क्र. ३७ – सचिवाचे अधिकार –** प्रत्येक अपार्टमेंट संघाच्या समितीमध्ये सचिव पदाला फार महत्त्व असते. कारण सचिवाकडे संघाची सभा बोलावणे, त्याची कार्यक्रम पत्रिका तयार करणे, प्रत्येक सभेचे इतिवृत्त (मिनरस) तयार करणे. तसेच संघाची हिशोब पुस्तके नोंदवह्या (रजिस्टर्स) अद्ययावत ठेवणे, या प्रकारची अनेक कामे सचिवाला करावी लागतात. संघाचे दप्तर अद्ययावत ठेवून प्रत्येक अपार्टमेंट धारकाचे प्रश्न व्यवस्थापन समितीमार्फत सोडवण्याचे मुख्य कार्य सचिवाला (सेक्रेटरी) **करावे लागते.**

**नियम क्र. ३८ – खजिनदाराची कामे –**अपार्टमेंट संघाचा खजिनदार (ट्रेझरर) संघाच्या आर्थिक हिशोबास जबाबदार असतो. संघाच्या ठेवी योग्य ठिकाणी ठेवणे, संघाचा जमाखर्च ठेवणे, लेखापरीक्षण दरवर्षी करून घेणे, वर्गणी गोळा करणे, पत्रव्यवहार पाहणे/करणे या प्रकारची आर्थिक व्यवहाराशी निगडीत सर्व कामे खजिनदाराची असतात.

क्रमश:

**अॅड. जयंत कुलकर्णी**
Email - advjgk@yahoo.co.in

*****

# दि यवतमाळ अर्बन को-ऑप.बँक लि., यवतमाळ

## THE YAVATMAL URBAN CO-OP. BANK LTD., YAVATMAL

॥ साहसे श्री : प्रतिवसति ॥

Regd.No.YML/BNK/114

मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001 - **Phone :** 07232 - 244241, 243703, 237442
**E-mail :** ho_adm@yavatmalurbanbank.com - **Website :** www.yavatmalurbanbank.com



**कर्जाचे अत्यंत माफक व्याज दर 8.25%* पासुन सुरू**

*नियम व अटी लागू

**आम्ही जपतो वारसा विश्वासाचा**

| **डॉ. नितीन खर्चे** अध्यक्ष | **अजिंदरसिंह चावला** उपाध्यक्ष | **श्रीधर कोहरे** मुख्य कार्यकारी अधिकारी

**संचालक -** श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री.आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री.प्रशांत अरुण माधमशेट्टीवार, श्री.संजय चिंतामणराव डेहणकर, श्री.प्रमोद मधूकरराव धुर्वे, ॲड.श्री.प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री.गोवर्धन दयाराम राठोड, श्री.परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ.श्री.महेश दामोधर सारोळकर, श्री.वसंता रामजी सुपारे, श्री.संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ.शिला राजेश्वर निवल, श्री.नरेंद्र देवराव देशपांडे (तज्ञ संचालक), ॲड.श्री.संतोष विठ्ठलराव कुचनकर (तज्ञ संचालक)

## सहकार क्षेत्रातील निधी सहकारातच यावा - अनास्कर

**पुणे –** सहकार क्षेत्रातील निधी सहकारातच अधिक प्रमाणात उपयोगात आणून सहकार चळवळ सक्षम करण्यावर लक्ष देण्याची गरज आहे, असे मत राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी येथे सांगितले. राज्यातील पतसंस्थांच्या कार्याला बळकटी मिळावी आणि राज्यात पतसंस्था चळवळ अधिक सक्षम करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन अध्यक्ष काका कोयटे उपस्थित होते.

## राजर्षि शाहू सहकारी बँकेचा श्रीराम लाईफ इन्शुरन्स कंपनी बरोबर करार

**पुणे –** ग्राहकांना विमा सेवा उपलब्धा व्हावी यासाठी येथील राजर्षि शाहू सहकारी बँकेने श्रीराम लाईफ इन्शुरन्स कंपनी बरोबर करार केला आहे. बँक अध्यक्ष सुधाकर पन्हाळे, उपाध्यक्ष शांताराम धनकवडे, कंपनीचे मुख्य विक्री अधिकारी कंकन बॅनर्जी आणि प्रादेशिक प्रमुख अमित अग्रवा आणि अन्य पदाधिकारी, अधिकारी यावेळी उपस्थित होते. बँकेच्या विविध ठेव योजना, कर्ज योजना आणि डिजिटल उत्पादनाबरोबर विमा उत्पादनेदेखील बँकेच्या सर्व ग्राहकांना उपलब्ध करून देणार आहेत. विम्याच्या माध्यमातून विविध जोखमीचे नियोजन ग्राहकांना करता येणार आहे.

## बचत गटाच्या माध्यमातून महिलांच्या सबलीकरणाचा प्रयत्न

**हातकणंगले –** बचत गटाच्या माध्यमातून महिलांच्या सबलीकरणाचा आणि सक्षमीकरणाचा प्रयत्न व्यापक स्तरावर होण्याची आवश्यकता आहे, असे मत इचलकरंजी जिव्हाजी सहकारी बँक माजी अध्यक्ष अंजली बावणे यांनी येथे सांगितले.

येथील आबासाहेब पाटील रेंदाळ सहकारी बँक आणि लोककल्याण कमिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या महिला मेळाव्यात त्या बोलत होत्या. सरपंच सुप्रिया पाटील अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी तेजस्विनी पांचाळ, बँक अध्यक्ष अरुण महाजन, कमिटीचे उपाध्यक्ष अनिल विभूते आदी पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक कमिटी अध्यक्ष चंद्रकांत शिंगारे यांनी तर सूत्रसंचालन शुभांगी करडे यांनी तर बँक उपाध्यक्ष सत्यजित पाटील यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाला बचत गट महिला सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी विविध योजनांची माहिती सांगण्यात आली.

## सातारा जिल्ह्यातील ५९३ विकास संस्थांना मंजुरी

**सातारा –** 'सहकार से समृद्धी' या केंद्रीय योजनेंतर्गत सातारा जिल्हात ९७६ विकास संस्थांपैकी ६१५ संस्थांनी कॉमन सर्व्हिस सेंटरसाठी अर्ज केले होते. त्यातील ५९३ विकास संस्थांना केंद्र चालवणेसाठी मंजुरी मिळाली आहे.

तसेच ४०८ संस्थांची केंद्रे सध्या सुरू आहेत. तसेच ४ विकास संस्थांनी जनऔषधी केंद्रे जेनेरीक मेडीकल सुरू करणेसाठी अर्ज केले आहेत. रहिमतपूर विकास कोरेगाव, केळघर विकास केळघर, जावली, चरेगाव विकास-चरेगाव, कराड या संस्थांनी जनेरीक मेडीकल सुरू केली आहेत. ५ विकास संस्थांनी ग्रेन स्टोअरेजमध्ये गोदामाचे बांधकाम पूर्ण केले असून ५० विकास संस्थांनी पी.एम. किसान समृद्धी केंद्रामार्फत खते-बी-बियाणे, औषधे विक्रीसाठी दुकाने सुरू केली आहेत.

जिल्हात एकूण ४७१७ सहकारी संस्था नोंदणी केलेल्या असून जिल्हात पहिल्या टप्प्यात ९३३ संस्थांना या कार्यक्रमातर्गत संगणक हार्डवेअर व सॉफ्टवेअर देणेत आले आहे. 'सहकार से समृद्धी' यामध्ये विकास सहकारी संस्थांचे संगणकीकरणाचे काम राज्यात झाले आहे.


## सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या; कराड
### (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. माधवेंद्र कोरडे** - (फक्त मेसेजसाठी) **९८५०५७१४०५**
**श्री. श्रीकांत पटवर्धन** (प्रदेश कार्यालय प्रमुख) **९२२५८२५३९९**

सहकार भारती पुणे कार्यालय - ऑफिस क्र. १०५, सांकला आर्केड, गांधी खादी भांडारच्यावर, कर्वे रोड, एरंडवणा, पुणे- ४११ ००४ ई-मेल : sahakarbharati1416@gmail.com

सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती – संपादक

**श्री. संतोष गावंडे :** रिजनल हेड (विदर्भ) 9420116337

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| सातारा | श्री. विनायक भिसे | 9923396312 |
| सांगली | सौ. श्वेता कुलकर्णी | 8830837005 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर शहर | सौ. दिपाली कुलकर्णी | 9049785111 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| **कोकण विभाग** | | |
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-दहिसर | श्री. हितेश वाघेला | 8828384482 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 7738449033 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| वसई | श्री. संतोष शिंदे | 8652415015 |
| मुरूड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |
| पनवेल | श्री. संजय पावसकर | 8928323997 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| चाळीसगाव, जळगाव | ॲड. विकास देवकर | 7588440640 |
| धुळे | श्री. बी. एम. कुलकर्णी | 9420602441 |
| पिंपळनेर, धुळे | श्री. सुर्यकांत जगताप | 9552570515 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| **मराठवाडा विभाग** | | |
| छत्रपती संभाजीनगर | श्री. अभय बावस्कर | 9422202569 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| लातूर | श्री. शरद दिवे | 8275020460 |
| परभणी | श्री. संतोष पाथरीकर | 9763012439 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | ॲड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| **विदर्भ विभाग** | | |
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |
| भंडारा | श्री. मुकुंदा पांढरीपांडे | 9420514872 |

**सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.**

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार कायदा व वसुलीची प्रक्रिया | २००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन | ३५०/- |
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण | १२५/- |
| ४ | डिजीटल तंत्रज्ञानाचे धोके व सावध, सुरक्षित वापर | १५०/- |

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

सहकार सुगंधची वर्गणी १ जानेवारी २०२५ पासून–
वार्षिक रु. ७००/– त्रैवार्षिक रु. १८००/–

**UPI ID**
**SahakarSugandha@DNSbank**

**A/c Name : Sahakar Sugandha**
**Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.**
(Sihagad Road, Pune Branch)
**Current a/c No. : 07801110000065**
**IFS Code - DNSB0000078**

**UPI ID**
**SahakarSugandha@SBI**

**A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.**
**Bank Name : State Bank of India**
(Hingne Khurd, Pune Branch)
**Current a/c No. : 36931889346**
**IFS Code - SBIN0007159**

कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. **sahakar.sugandha@gmail.com**

**महाराष्ट्रात जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क : ८८०५९८१६७३**

24 CARAT SECURITY FOR YOUR VALUABLES

Godrej

# UNMATCHED SECURITY
## UNCOMPROMISED STRENGTH



• Defender Aurum Pro Safe • Anti Intrusion Fogging Device
• Strong Room Door • Defender Prime Safe • Gold Testing Machine

SCAN TO KNOW MORE

For more information contact:

**Sibashis Paul** 9854026321

## सहकार चळवळीतील महनीय व्यक्तींचा जीवनप्रवास
## महाराष्ट्रातील १७५ कार्यकर्तृत्वांचा सचित्र आलेख




**सहकार भारती प्रकाशित**
**सहकार सुगंध निर्मित...**




# सहकार महर्षी

**सहकार चळवळीतील प्रत्येकाने**
**आवर्जून वाचावा असा ग्रंथ**

**सहकार महर्षी ग्रंथ – प्रतींनुसार विशेष किंमत (कुरिअर मोफत)**


| | | |
|---|---|---|
| १ ते ५ ग्रंथ घेतल्यास | – | रु. १५००/– प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ६ ते १० ग्रंथ घेतल्यास | – | रु. १३५०/– प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ११ व त्यापेक्षा अधिक घेतल्यास | – | रु. १२००/– प्रमाणे प्रती ग्रंथ |

A/c Name :
Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name :
State Bank of India
Branch :
Hingne Khurd, Pune Branch
Current a/c No. : 36931889346
IFS Code : SBIN0007159

UPI ID SahakarSugandha@SBI
सोबत दिलेला QR कोड स्कॅन करून
ऑनलाईन पेमेंट करावे व तसे कार्यालयास कळवावे.

- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी शिफारस केलेला ग्रंथ


**बुके नको 'बुक' देऊ या! आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला 'सहकार महर्षी' ग्रंथ देऊ या!**


Janaseva Sahakari
Bank Ltd. Hadapsar,
Pune
आव्हान ...
ग्लोबल वॉर्मिंगचे,
पर्यावरण संवर्धनासह
लाभ मिळवा सेव्हिंगचे !
रुफटॉप सोलर इलेक्ट्रिक, सोलर वॉटर हिटरसाठी
जनसेवा बँक सोलर कर्ज
अल्प प्रोसेसिंग फी
किफायतशीर व्याजदर
सुटसुटीत कर्ज प्रक्रिया
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
www.janasevabankpune.net

# सहकार भारतीचे मुखपत्र सहकार सुगंध निर्मित

# नागरी सहकारी 2025
# बँक / पतसंस्था दैनंदिनी

**नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेच्या सर्व परिपत्रकांचा**
**मराठीत संक्षिप्त गोषवारा तसेच QR कोडच्या**
**मदतीने RBI ची सर्व मूळ परिपत्रके**
**उपलब्ध असणारी एकमेव दैनंदिनी व**
**नागरी सहकारी पतसंस्थेच्या दैनंदिनीमध्ये गेल्या**
**तीन वर्षातील सर्व महत्वाच्या परिपत्रकांचा समावेश**
**देशभरातील नागरी सहकारी बँका व पतसंस्थांच्या**
**संख्येनुसार आर्थिक स्थितीच्या उपयुक्त माहितीसह...**




## नागरी सहकारी बँक दैनंदिनी २०२५

**किंमत रु. 500/-**

**अधिक प्रतींसाठी**
**विशेष सवलत**

आजच नोंदणी करा!

**किंमत रु. 400/-**

**अधिक प्रतींसाठी**
**विशेष सवलत**

आजच नोंदणी करा!

## नागरी सहकारी पतसंस्था दैनंदिनी २०२५




**सहकार भारतीचे मुखपत्र 'सहकार सुगंध'**
कार्यालय : ऑफिस नं. 15, विष्णुप्रिया अपार्टमेंट,
गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे - 411 030
मो. : 8805981673 ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

safeage
Security Products Pvt. Ltd.

# OM SALES CORPORATION



## All our Products are BIS Standards

Our Certificates

| ISO 14001 : 2004 | IS 5244 : 2014 | IS 550 : 2014 | IS 11188 : 2014 | ISO 9001 : 2008 |
|---|---|---|---|---|
| | CM/L-7500087614 | CM/L-3978088 | CM/L-2870669 | |



Electronic safe | Depository safe | Gold Safe | Fire Resistant Cabinet | Fire Resistant Filing Cabinet | Industrial Locker | Compactor


**Nilesh Bonde Mob.: 9850120090 / 8698337947**

**Website : www.omsalescorportion.net I Id : omsales.safeage@gmail.com**

Add. : S.No. 179, Fuge Vasti, Behind Pyramid Hotel,
Near Gajanan Maharaj Mandir, Magzine Chowk,
Bhosari-Alandi Road, Bhosari - 411039.

Factory Add - Safeage Security Products Pvt. Ltd., Shiye, Jyotiba Road, Kolhapur

We are authorised distributor for Pune, Satara, Sangli, Solapur, Ratnagiri, Sindhudurg, Raigad, Ahemadnagar, Nashik, Jalgaon, Dhule, Nandurbar, Aurangabad, Jalna, Parbhani, Hingoli, Usmanabad, Beed, Latur, Nanded, Buldhana, Akola, Amravati, Yavatmal, Washim, Nagpur, Bhandara, Wardha, Chandrapur, Gadchiroli, Gondiya,


50+ YEARS OF MOMENTUM
अर्थ
सहकारेण
कल्याणम्
दि कल्याण जनता
सहकारी बँक लि.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
तुमच्या उच्च
शैक्षणिक स्वप्नांना
आर्थिक पाठबळ
देणारी बँक
एकूण शैक्षणिक खर्चाच्या
90% कर्ज उपलब्ध.*
प्रोसेसिंग शुल्क व
प्रिपेमेंट शुल्क नाही.
कल्याण सरस्वती
(शैक्षणिक कर्ज योजना)
* अटी व शर्ती लागू
TOLL FREE: 1800 233 1919
kalyanjanata.in
KJSBank


टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
करा स्वप्न पूर्ण नवी कार घेण्याचे
टीजेएसबी
ऑटो लोन संगे
व्याजदर
8.35%*
द.सा. पासून
*अटी लागू
www.tjsbbank.co.in
Toll Free: 1800 266 3466 / 1800 103 466

Registered - SAHAKAR SUGANDHA - RNI NO. MAHMUL/2005/16099
Magazine Post Reg. No. : MSD/057/2025
(Publication Date - 05/02/2025) Posting on 07/02/2025 Posting at Magazine Post, Mumbai PSO, Mumbai 400 001




प्रेषक :
**सहकार सुगंध कार्यालय**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट,
५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा,
सिंहगड रोड, पुणे - ४११०३०.
मो. : ८८०५९८१६७३

प्रति,